म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.
विषय वा०वा.
दा. क्र. ९२८५६

IRBK-0112957


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

[ क्र. मा. प. ]

२०५४
२१५१८

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ..१२८५४ नों दि ........
वि. ....



जिम कॉर्बे
लेखक—मॅनईटर्स ऑफ कुमावन्

जॉन टेलर
लेखक—मॅनईटर्स ॲन्ड मरॉडर्स

आणि

अशाच सर्व मानवहितकर्त्यांस

**अर्पण**

IRBK-0112957

IRBK-0112957

# अनुक्रमणिका

## भाग १


(१) हाजीर सो हथियार १
(२) पळपुटा ५
(३) चावडींतच शिकार ८
(४) पाठशिवणीचा खेळ १२
(५) स्वयंवर १६
(६) दुहेरी शिकार १९
(७) काळा वाघ २५
(८) भूत ३१
(९) चोरटी वाघीण ३७
(१०) राजे अन् दरोडेखोर ४०
(११) दृष्टिकोन ४२


## भाग २



(१) मामांशी ओळख ४९
(२) शिकारी अन् तत्वज्ञान ५३
(३) राजाची जात ५७
(४) मर्द आणि मुत्सद्दी ६२
(५) धोका नको ६७
(६) तत्त्वज्ञान ७१
(७) शिकारी नीतिपाठ ७४
(८) निकाली कुस्ती ७७
(९) त्यांत काय मोठेसें ८१




ध्याय महाविद्यालय प्रकाशन.
पुणे २

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ...... 32850
विभाग ......
क्रमांक ......
नों. दि. ......

# आजीच्या शिकारकथा
## (भाग १ व २)



कथनकार:

जानकीबाई चितळे

पूरक :

वि. र. चितळे

डिसेंबर ६१ मूल्य १ रु.

27 FEB 1976

# प्रस्तावना

थोरांच्या आशीर्वादावरहि छोट्यांची तृप्ति होते, मग त्यांच्या मूर्तिमंत कृपेची गोष्टच कशाला? ह्या कथांपैकीं बऱ्याच कथा श्री. य. गो. जोशी यांनीं "प्रसाद"-मध्यें स्वतःच्या वात्सल्यगुणामुळें छापल्या; त्यांत कांहीं फेरफार व भर घालून दोन भाग, एक आजी कथा सांगत आहे असा व दुसऱ्या तशाच ऐकून पुनः सांगितल्या आहेत असा, असे केले आहेत. शेवटच्या दोन कथा मात्र आजीच्या नाहींत. बिरदेल–तोरखेडे टपाल हलकऱ्याचें काम करणाऱ्या शंकर भिल्लानें स्वतःच्या वडिलांची कथा सांगितली होती ती व चणकापूरला धरण पहावयास गेलों असतांनाची दुसरी, ह्या स्वतंत्रच आहेत.

वाचकांकडून समाधान एवढीच अपेक्षा आहे.

स्वाध्याय–महाविद्यालय प्रकाशनानें बालवाङ्मय विभागाचा आरंभ करण्यासाठीं ह्या कथांची निवड केल्याबद्दल आभारी आहे.

–वि. र. चितळे

जानकीबाई चितळे



★

बाळांनो –

वाघाच्या गोष्टी आवडतात ना तुम्हाला ! अन् आजींनीं सांगितलेल्या ? काय ? तुम्हाला आजीच नाहीं ? बरं मग ह्या आजी तुम्हाला वाघांच्या अन् शिकारीच्या गोष्टी सांगतील हं आतां.

पण हो, त्या ऐकल्यावर, एक गोष्ट कबूल करावी लागेल. ह्या गोष्टींत वाघांशी झुंज देणाऱ्या मामांसारख शरीर कमवायच, संकटाला धैर्यानं तोंड द्यायच. काय आहे कबूल ? मग ऐका आतां–

विभाग ...
क्रमांक २०४४
नों. दि. ...

— भाग १ ला —

# हातीर त्यो हथियार



( हातीं सांपडेल
तेंच हत्यार )

## १

"बाळांनो, वाघ पाहिला आहे ना सर्कशींत तुम्हीं ? कसे मोठाले दांत असतात त्याचे, अन् दुरून त्याचे पाय जरी बारीक वाटतात ना, तरी पिंजऱ्याजवळून कसे जाडजाड दिसतात. चांगलाच बळकट असतो तो. त्याची शिकार बंदुकीनें करतात आतांशा; पूर्वी भाल्यांनींसुद्धां करीत. पण त्यांत धोका फार अन् शरिराची शक्तिहि जास्तच लागे.

पण नुसत्याच रुळानें किंवा हत्यार न घेतांच जर कोणी वाघ मारला, तर ? त्याला पराक्रमी म्हणाल कीं नाहीं ? अशीच एक गोष्ट सांगणार आहे हं मी आतां."

माझे मामा मोजणीदाराच्या नोकरीवर होते. शेतं असतात ना ? त्यांचीं मोजमापं घेऊन हद्दी ठरवायच्या हें काम असतं मोजणीदाराचं. तें काम करीत होते मामा खानदेशांत, कळवण तालुका आहेना तिथं. हो, पण आतां कळवण नाशिक जिल्ह्यांतला

तालुका आहे नाहीं कां? पण मीं सांगतें ना ती फार जुनी गोष्ट आहे. मी होतें आठ वर्षांची तेव्हां. आतां सत्तरच्या वर वय झालें आहे. तेव्हां कळवण तालुका खानदेशांतच होता. तिथें जंगल होतं दाट. नवीन शेतजमीन तयार करीत होते त्यावेळीं जंगल तोडून. अन् धरणही होणार होतं एक. चांदवडचे डोंगर म्हणतात ना? त्यांच्या लगतच पलीकडे आहे तो भाग.

अभोणें गांवच्या आसपास शेतीची मोजणी चालू होती तेव्हां. गांव खेडंच आहे, पण आतां त्या बाजूला एक नवीन तीर्थक्षेत्र आहे; गिरणा नदी तेथें जवळच उगम पावते. तिच्यावर चणकापूर गांवीं धरण बांधलं आहे. तें जवळच आहे आभोण्याहून, पण त्य वेळीं नव्हतं धरण. मग बांधलं ५–७ वर्षांनीं.

डोंगर अन् दाट झाडी ह्यांत रानटी जनावरं असायचीच. तसे तिथें झाडींत पट्ट्यांचे वाघ अन् खुरट्या झाडोऱ्यांत बिबळे वाघ होते पुष्कळ. बाजूला झाडी अन् मधेंच ती तोडून शेत केलं तर तें मोजतांनाही भीति वाटे. इकडून वाघ येईल कां तिकडून अशी सारखं धाकधुक वाटायची. जरा दुपार कलली कीं अंधार वाटायला लागायचा. लोक राहायचेंच नाहींत रानांत मग!

अशी एका शेताची मोजणी चालली होती. मामांच्या हाताखालीं महादू नांवाचा कारकून होता. सांखळी धरतांना त्याची चूक झाली तशी मामा गरजले, "म्हाद्या, लक्ष कुठें आहे?"

मामा साधे बोलत तेच खूप मोठ्यानें. फार मोठा आवाज होता त्यांचा. मग रागावले किंवा ओरडले तर गडगडाटच वाटायचा. लहान मुलं, तुमच्यासारखीं, भ्यायची अन् मोठीं माणसं सुद्धां घाबरायची ऐकून. महादू तर थरथर कापायला लागला.

"पण मामांच्या भीतिपेक्षांहि मोठी भीति वाटत होती त्याला वाघांची. ३–३॥ वाजले होते; अन् सावल्या वाढत होत्या. म्हणून तो धीर करून म्हणाला, "पंत, संध्याकाळ झाली. आतां पुरे." हें म्हणतांनाही तो डाव्या-उजव्या खांद्यांवरून वळून पहातच होता. मामांना महादू भित्रा आहे हें माहीत होतें. तेव्हां ते पुन्हा खेंकसून ओरडले, "चल काम कर. कुठलीं भुतं तुला गिळायला येतात पहातों. डरना नहीं! जिवंत ओढून काढीन डांच्यांतून त्यांच्या."

मामांचा आत्मविश्वास दांडगा अन् ताकद फार. त्यामुळें महादूला जरा धीर येऊन तो काम करूं लागला.

मापें घेऊन तीं लिहिण्याच्या कामांत मामा गर्क होते. तेवढ्यांत शेताच्या कडेवरून महादूची थरथरती ओरड ऐकूं आली ––

"पंऽऽत! वाऽऽघ."

मामांनीं चटकन् वर पाहिलें, महादू धावत मामांकडे येत होता अन् एक वाघ पळत त्याच्या मागून येत होता.

रेघा आंखायचा रूळ मामांच्या हातांत होताच. आताशा तसे रूळ दिसत नाहींत. चांगला जाडजूड शिसवीचा अन् २–२॥ हात लांब होता तो. जडही खूपच होता. लांकूड पाण्यावर तरंगतें हें माहीत आहेना तुम्हांला? पण शिसवीचें लांकूड मात्र बुडतं बरं कां. इतकं जड असतं तें. तो रूळ घेऊनच मामा धांवले तिकडे. तेवढ्यांत वाघ महादूपर्यंत पोंचलाहि होता; त्यानें झेंप टाकून पुढचे पंजेसुद्धां टेकले त्याच्या खांद्यावर. महादू दुबळाच होता. त्या उडीनें अन् वाघाच्या वजनानें तो खालींच कोलमडला.

तेवढ्यांत मामा पोहोंचलेच त्यांच्याजवळ. येतायेतांच रूळ उगारला होता त्यांनीं; तो सर्व शक्ति एकवटून वाघाच्या पाठींत मारला. वाघ 'ख्यॉं' करून ओरडत मामांच्या अंगावर धांवला. पण त्याचे मागले पाय नुसतेच लोळायला लागले होते. मामांच्या हातांतल्या रूळाचेही दोन तुकडे होऊन एक हातांत राहिला होता.

त्यावेळीं मोजणीची पद्धति 'शंकू-सांखळीची' होती. एक भला मोठा गोळा असे वजनदार; त्याला शंकू म्हणत. मामांनीं तोच हाणला वाघाच्या टाळक्यांत अन् कपाळमोक्ष केला त्याचा.

महादूच्या जखमा कांहीं मोठ्या नव्हत्या फार, पण तो घाबरूनच बेशुद्ध झाला होता. त्याला गाडींतून अभोण्याला चावडींत आणला. दुसऱ्या गाडींत वाघही आणला. महादू बेशुद्धावस्थेंतच 'वा ऽऽ' घ म्हणून बरळत होता.

मामा चावडींत पोहोंचतात तों ही गर्दी महादूभोंवतीं जमली मामांनीं सर्वांना ओरडून दूर केलें. महादू अद्याप शुद्धीवर नव्हता आला. मामा ओरडले. "डरपोक लेकाचा, उठ. वाघासमोर नाहीं मेला तर चावडीवर मरतो आहे!" मामांचा आवाज ऐकूनच महादू शुद्धीवर आला.

जिल्ह्याचे कलेक्टर एक सिमकॉक्स म्हणून होते. ही बातमी समजतांच त्यांनीं एक बंदूक अन् परवाना दिला बक्षीस म्हणून, पण कातडं मात्र घेतलं त्यांनीं!!

# २

# पळपुटा–



आम्हीं अभोग्याच्या मामांच्याकडे गेलो होतों. मामांचा मुक्काम चावडीवरच असे. जसजशी मोजणी चाले तसतसा मुक्काम हालत असे. मामा, मामी, त्यांचीं दोन मुलं, माझी आई अन् मी इतकीं होतों आम्हीं. सगळं सामान बैलगाडींत भरायचं अन् त्याच गाडींत बसायचं, मजा यायची पहा त्या प्रवासांत. आतां तुम्हांला मोटारींत बसायला मिळतं पण आजूबाजूला पहायला कांहीं मिळत नाहीं.

अजूनसुद्धां खेड्यांमध्यें गाडीनें प्रवास करतात. पण ५० अन् १०० मैल दिवसन् दिवस असें नाहीं जात बैलगाडीनं.

तर काय वरं सांगत होतें ... हं बरोबर. हं ... मुक्काम होता चावडींत, बाजूला एकीकडे घरं अन् दुसरीकडे शेतं. पाय-खानें, मोऱ्या कांहीं नव्हतं चावडीला. शेतांतच जायचं.

एके दिवशीं मामा रात्रीं ९ वाजायच्या सुमाराला परसाकडे निघाले. एका हातांत तांब्या दुसऱ्यांत कंदील, अन् बगलेंत सोटा· जंगलच होतं बाजूला तेव्हां साप-किरडं असायचींच म्हणून सोटा हवाच.

हो पण विसरलेंच कीं, कंदील म्हणजे आतां सारखा प्रभाकर नमुन्याचा नाहीं हो ! ! त्यावेळीं चार छोटचा छोटचा कांचा असलेले चौकोनी कंदील असत. रॉकेलसुद्धां नव्हतं बरं कां. एरंडी किंवा खोबऱ्याच्या तेलाचा दिवा नाहींतर मेणबत्ती असे आंत. फार फॅशनचा कंदील म्हणजे जपानी. त्यांच्यांत वात खालींवर करण्यासारखी खोबरेलाची चिमणी, तीन बाजूंना बिलोरी कांचा अन् वारा आला तरी दिवा टिकावा अशी रचना होती. मागें आरशासारखा पण खोल परावर्तक होता. त्यामुळें त्याचा प्रकाश पुष्कळच पडे.

तसा गांवठी कंदील घेऊनच मामा गेले होते बाहेर. बाजूला थोडा खस्खस् आवाज वाटला, म्हणून त्यांनीं कंदील जरा वर धरून पाहिलें.

वाघाचे डोळे अंधारांत सुद्धा चमकतात. मांजराचे डोळे पाहिले कां तुम्हीं कधीं रात्रीं ? तसेंच पण ... खूप मोठे. तेव्हां कंदिलाच्या उजेडांत तर ते एकदमच चमकले.

अशा वेळीं मामांचा नेहमीचा उपाय म्हणजे सोटा जमिनीवर आपटणें. त्यांचा सोटा आपल्या मनगटासारखा जाड, भरीव बांबूचा. मुळखंडाच्या भागाची साफसूफ करून मूठ बनविलेली होती. तो आपटला कीं केवढा खणखणीत आवाज होई ! पहायलाच नको. भरीस 'कोण आहे ?' अशी गर्जना केली कीं बस्. लहानसहान जनावरें तर "गरम पडेल शिकार" म्हणून निघूनच जात.

पण हें लक्षण कांहीं तसें नव्हतें, वाघानें आपली मान आंत घेतली; पण टेहेळणी तशीच चालू ठेवली.

मुद्दाम माणसाच्या अंगावर येणारें जनावर धोकादायक असते. बिबळ्या असा येतो अंगावर. पण पटाईत वाघ म्हातारा झाला किंवा माणसाची शिकार सहज जमते, हें चुकून लक्षांत आलें, तरच माणसाच्या मागें येतो. वाघ तर मोठा भासत होता; तेव्हां हें नुसत्या सोटयावर बधणारं प्रकरण नाहीं हें तर उघड दिसलं.

"सीते!" मामांची आरोळी आली. सीता म्हणजे माझी आई हं. "बन्दूक आण भरून."

मामांचा आवाज दुरून येतांच मामींची तर बोबडीच वळली. त्यांनीं दोनही मुलें जवळ घेऊन 'काय, काय ?' एवढंच म्हणायला सुरुवात केली. मी आईला "काय झालं गं ताई ?" असं हळूंच विचारलं.

आईनें आवाज न करतां, 'गप्प' असा नाकावर बोट ठेऊन इशारा दिला. बंदूक कोपऱ्यांतच उभी होती. अन् काडतुसांचा पट्टाही खुंटीलाच होता. आईनें दोन काडतुसें भरलीं बंदुकींत व घेतली ती. ती कांहीं लहानसहान नव्हती आत्ताच्या रायफली-सारखी. दोन नळ्यांचं बारा नंबरचं धूड होतं तें. बारा नंबर म्हणजे समजलं कां? नाहीं ना? अर्धा शेर शिशाच्या बारा गोळ्या करायच्या म्हणजे केवढी गोळी होईल ? तशा गोळीची बंदुक. आईनें ती घेतली दोन हातांत पण मग दिवा कसा धरायचा ?

"माई, दिवा घेऊन चल माझ्या मागें. अगदीं जवळ बरं कां," आईनें सांगितलें.

लहान मुलं बावळट असली म्हणजे त्यांना कांहीं भीति वाटत नाहीं. मीही बावळटच होतें, हें बरं होतं. मी दिवा घेऊन आईच्या मागें गेले.

मामा तिथून २०-२५ पावलांवरच होते. त्यांनीं कंदील डाव्या हातांत घेतला, अन् मागें न वळतांच हात मागें करून बंदूक घेतली.

हें वाघाच्या लक्षांत आलें. हें कांहीं ठीक लक्षण नाहीं असें वाटून त्यानें सरसर आवाजांतच माघार घेतली.

" गेला . . . शेपूट घालून, " मामांनी शेरा दिला. आम्ही परत आलों. मीं मामींना सांगितलं, " कांहीं नव्हतं गं. एक वाघ होता, पण आम्हांला भिऊन पळूनच गेला तो ! "

---

# ३ चावडींतच शिकार !

वाघाला मी पळपुटा म्हटलं त्याचं मामींना हंसूच आलं· पण मामा मात्र त्यापुढें बंदुकींत काडतुसें भरून ठेवूं लागले. त्यांचे बंदुकीला वरून घोडे होते. आतांच्या रायफलींना दाराच्या मागें जसा सरळ बोलट असतो तसा बोलट असतो. घोडे अगदीं अलगद बंद करून बंदूक खुंटीवर ठेवूं लागले ते. त्यांना माहीत होते कीं माणसाच्या आसपास हिंडणारा हा वाघ कदाचित् चावडीवरच यायचा. चावडीला ३ भिंती होत्या पण चवथी भिंत नव्हती, अन् दारही नव्हतें !

रात्रीं १२ वाजायची वेळ होती. थंडीचेच दिवस होते. सगळीं माणसं एका कोपऱ्यांत झोपली होती. गांवोगांव हिंडायचं

तर गाद्या-गिरद्या कुठच्या ? एक मोठा सोऱ्या (जाजम) अंथ-रायला व एक लेप सर्वांना पांघरायला. लेप म्हणजे कापडाची पातळ पण खूप मोठी गादी. ती फॅशनेबल असली तर 'रजई' म्हणतात, पण लेप असे जाडच्या-भरडच्या कापडाचा. त्या कापडावर कातासारख्या रंगानें छापलेली नक्षी असे. जाजमं असतात नां ? त्यांच्यासारखी.

रात्रीं रामू, म्हणजे मामांचा मुलगा, चुळबुळत उठला. त्याला मुतायला आली होती. त्यानें मामीला उठवलं. मामी डोळे चोळीतच उठली. आतां मुलाला उठवून ओटच्याखालीं न्यायचं. त्यांनीं तिकडं पाहिलं.

चावडीसमोर शेकोटी पेटवलेली होती. ती आतां विझली होती. पण एक जाड लांकूड लावून ठेवलेलें होते. त्याच्या ठिणग्या वाऱ्यानें उडत होत्या. मामींना त्यांतच जरा वेगळे वाटले निखारे दोन. त्यांनीं नीट पाहिलें अन् घाबरतच ताईला हलवलं. ताईंनी जरा चमकूनच उठून बसत तोंड उघडलं. पण मामींनीं त्यांच्या तोंडावर हात ठेवून फक्त बोटानेंच समोर दाखविलें.

शेकोटीच्या जवळच एक वाघ आरामांत बसून ओटीला बांधलेल्या बैलांकडे पाहात होता. एखादा बैल कसा उडवावा हाच बेत दिसला त्याचा.

ताईंनी लगेच मामांना जागं केलं. त्यांनीं जाग येतांच वाघाला हुसकावं असा विचार केला. वाघ हळुहळू बैलांकडे सरकत होता; इतक्यांत हातांत सोडगा घेऊन मामांनीं ओटच्या-खालीं उडी मारली !

पण वाघाला तो आवाज पाठीमागें वाटल्यामुळें तो रस्ता बंद झाला अन् माणसं आलीं, तेव्हां पळून जायचा रस्ता म्हणून त्यानें ओटचाकडेच मोर्चा वळवला.

आतां मात्र दूरचें संकट जवळ आलें. सीतामाईनें तेवढ्यांत बंदुक काढून जमिनीवर तिचा दस्ता वाजवला. तो खळ्ऽखण् आवाज ऐकून वाघानें आपला मोर्चा दुसऱ्या कोपऱ्यांत वळवला.



त्या कोपऱ्यांत, एक थोड्या वेळाकरितां कैदी ठेवायचा असला तर त्याकरितां, खोली होती. खोली म्हणजे बांबूचा एक पिंजराच. लोखंड ही कांहीं आजच्यासारखीं सगळीकडे मिळणारी वस्तु नव्हती तेव्हां. मग लोखंडाचे गज कोठचे असायला?

वाघ ओटचाकडें वळतांच मामा गरजले, "सीते, पोरं संभाळ!" वाघाच्या तोंडीं पोरं संभाळणं म्हणजे काय तोंडचं

काम आहे ? सीतामाईनीं लेप पुरा झांकला सगळ्यांवर आणि ती तेथंच पुढे उभी राहिली.

मामाही वाघाच्या मागोमागच वर चढून आले होते. वाघ पिंजरेवजा खोलींत शिरला, तोंच त्यांनीं दार ओढून घेतलेहि.

बांबूचा पिंजरा म्हणजे वाघाला कांहींच नाहीं. पण थोडासा तरी आडोसा झाला. तेवढ्यांत ताईनीं बंदूक हातांत दिलीच पुढें होऊन.

'आपण पूर्ण अडकलों' हें वाघाच्या लक्षांत येण्याच्या आंतच मामांनीं धाड् धाड् दोन गोळ्या घातल्या. वाघाची एकच आरोळी निघाली, अन् रामूनीं अंथरुण ओलं केलं.

हें सगळं अंधारांतच बरं कां ! त्या वेळीं गोड्या तेलाचे दिवे रात्रीं ठेवणं म्हणजे आगीला आमंत्रण. उंदीर वाती जळत्याच पळवायचे. तेलसुद्धां जरा कमीच वापरायचं. आतांसारखे भुईमुगाचें नव्हतें तेल. पण आम्हांला कमी उजेडांत किंवा काळोखांत पहायची संवयच होती तेव्हां.



# ४



# पाठशिवणीचा खेळ

पिठूर चांदणें पडलें होतें. दोनही बाजूंस डोक्याएवढा उंच झाडोरा, म्हणजे तागासारखे सरळ वाढणारें रानटी झुडूप. त्यांतच कांहीं वृक्ष. अन् त्याच्या आधारानें जाळी गुंफून चढणाऱ्या वाळक्या वेली. हातभर सुद्धां दिसत नाहीं त्या पडद्यांत ! फक्त मधल्या गाडीरस्त्याचा तेवढा पांढरा पट्टा दिसे. गाडी पुरती भरली होती, पण जागे असे दोनच जण. मामा अन् गाडीवान. उन्हाळ्याचे दिवस, पण उंचावरचें ठिकाण अन् छायेची जमीन म्हणून थंडावा व झाडोऱ्यामुळें अजिबात वारा नसल्यामुळें गुदमरणावरा उबारा. दूर डोंगरावर वणवा पेटलेला. गाडीवाला जरा अस्वस्थच आहे. वास्तविक इकडच्या भागांत अंधार पडल्यावर गाडी चालवायची रीतच नव्हती. पण चांदणीरात्र अन् सरकारी बिगार ! ! मामांची हिंमत होती म्हणूनच बैलांचे जीव राहतील असा भरंवसा.

मनाचा अस्वस्थपणा घालवायला किंवा झांकायला विरंगुळा म्हणून तो पोवाडा म्हणतो आहे चोरट्या किनऱ्या आवाजांत. मामांचा गडगडाट,रातकिड्यांची कर्णकटु किर्रर, टिटवीची मधूनच

उंचावरून टिटिव, ह्यांच्यापुढें त्याचा आवाज गोडच म्हणायचा ! कासरा त्यानें गाडीच्या साटयाच्या खांबाला दिला अडकवून अन् सामानांतल्या परातीवर ताल धरला. सहा माणसांच्या संसाराचं सामान, तीन मुलें आणि चार मोठी माणसं गाडींत. बैलही चालताहेत धीमे धीमे, वातावरणानें भारल्यासारखे.

पोवाडयाचा चौक संपला आणि गाडीवानानें आजूबाजूला पाहिले. बैलांनीही चाल मंद केली. एवढा वेळ पोवाडयाच्या लयीनें मधूनच चार पावलें ते उचलीत लवकर. गाणं थांबतांच त्यांच्या-वरही कुंद वातावरणाचा प्रभाव पडला.

पोवाडा सुरूं होण्याला उत्साह वाटेना. दूरची कोल्हेकुई ऐकूं यायला लागली आतां. गाडीवानानें पाणी पिऊन हुशारी आणण्याचा प्रयत्न केला पण कांहीं वळेना. त्यामुळें जरा खुट्ट झालें कीं तो चमकून पहायला लागला.

सुमारे अर्धा कोस अशी गाडी चालल्यावर हळुहळू गती मंद होत गाडी अजिबात थांबली. बैल मुद्दाम थांबले तें गाडीवानाला कळलं त्यांच्या फुस्कारांनींच. एकदां डाव्या बैलाच्या शेपटीला आवळून तो खेकसला, “ अरं सर सुभान्या ” पण सुभान्या मागेमागेंच सरायला लागला अन् सरजाही हालेना !

“ काय झालं रे ? ” मामांनीं विचारलं

“ काय कीं, ” अन् बैलाची शेपटी जोरांत पिरगळीत तो ओरडला, “ अरं व्हऽऽय् ”

पण मामांनीं त्याला एकदम डंवचून म्हटलं, “ गप्प, पुढं बघ जरा. ”

"अर माझ्या बाऽरऽऽ" गाडीवान उद्‌गारला. समोरच्या वांकणांतच दोन डोळे चमकत होते हिरवे फॉस्फरसासारखे.

"वा रे मर्दा ! घाबरलास काय? सरक बाजूला!" मामा गरजले.

पण एथें वाघोबा वाटेवरच टपून बसले होते. मूर्तिमंतापुढें अमूर्त शब्दांनीं कांहीं धीर येईना त्याला, मामांचे असले तरी. गाडीच्या गतीमुळें पाळण्यातल्याप्रमाणें बसल्या बसल्याच डुलक्या घेणारी सर्व मंडळी गाडी थांबताच जागी झाली.

मामींनीं विचारले "बंदूक हवी कां ?"

"चांदण्यांत अंतराचा नाहीं अंदाज लागत अन् मुलं आहेत बरोबर. पोत्यांतलं घमेलं अन् पळी काढा बाहेर अन् होऊं द्या ताशा. तूं रे ठोल्या, वंगणाचा बांबू काढ. मशाल धरतो मी."

मामा गाडीखाली उतरले. एका हातांत मशाल अन् दुसऱ्या हातांत वेसणीच्या दोऱ्या धरून चालायला लागले. गाडीवानानें थोडा चारा पेटवला पण सभोंवार सगळाच दारुखाना (वाळलेलें गवत) होता.

एवढा स्वागत-समारंभाचा थाट पाहून अकस्मात् भेटीचा राजांचा बेत फिसकटला अन् मागेंच झाडोऱ्यांत अंतर्धान पावले ते.

लगेच बैल झपाझप् चालूं लागले अन् ताशा, वाजंत्री, मशाल अन् भजनं, गाणीं यांच्या थाटांत मिरवणूक निघाली.

घटकाभरांत मंडळी पेंगू लागली. अर्थात् वाजंत्री बंद पडलीं. मशालही मंदावलीच जरा, मामा मात्र गाडीपुढेंच चालत होते अजून.

एका झुलकींत मानेला हिसका बसल्यानें सीतामाईनें सांवरतच मान उचलून भोंवतीं पाहिलें. हळूंच मामांना सुचवलं, "तें पहा काय येतय गाडीमागें."

वाघानें पवित्रा बदलला होता. अगदींच नसलेल्या वाऱ्याची दिशा गाडीवरून आपणाकडे घेऊन पारध सुरूं झाली.

मामांनीं गाडीवानाला मशाल पाजळून पुढच्या बाजूला व्हायला सांगितलं, अन् स्वतः मागल्या बाजूनें चालायला सुरुवात केली. एवढ्यांत बंदूक भरून ठेवलेलीच होती अन् तरवारही सहज हाताशीं लागेल अशी ठेवली काढून.


दहा एक मिनिटं गेलीं तशीच अन् पाठलाग सुटला असे वाटलें. साहजिकच मिरवणुकीचा समारंभही संपुष्टांत आला; पण पुनः जरा वेळानें मागें चाहूल लागलीच. वाघ पिच्छा सोडतोसे दिसेना. ताशे-वाजंत्री, जाळाचा उपयोग तेवढाच.

"सीते, मी उतरतों खालीं अन् देतो फुंकून साल्याला. जरा पोरें संभाळ तूं."

"पोरं जातील सांभाळली पण थोरांचं काय?" मामी हळूच पुटपुटल्या. मोठ्यानें बोलायचीही चोरी मामांच्या पुढें. पण त्यांचं म्हणणं खरं आहे हें पटलं मामांना. 'चांदण्यांत वाघ नुसता जखमी होण्याचाच संभव फार. अगोदरच्या भीतींत जखमी जनावराची भर कशाला?" त्यांच्या मनांत विचार आलेला दिसला.

'आहे जागरण रात्रभर झालं,' इतकाच निष्कर्ष काढून मामा चुळबुळत बसले. पहांटे पहांटे वाघानें पिच्छा सोडला एकदांचा!

मामांचे परिचीत ही एक अजब गोष्ट समजतात. बेदरकार हिंमत अन् नेमबाजीवर दुर्दम्य विश्वास हे जणूं स्वभावगुणच होते मामांचे. पण मामा नंतर नेहमींच दुसऱ्यांचे बाबतींत विचार करायला लागले जास्त. प्राण गेल्यावर परत आणणें शक्य नाहीं हें सत्य त्यांना पटलें होतें. म्हाद्याच्या उदाहरणानें, वेळ सांगून येत नाहीं, हेहीं पटलें. त्याचे ओरबाडे बरे व्हायलाच तीन महिने लागले. नंतरही तो दिवसां रात्रीं स्वस्थ बसलेला असला कीं, एकदम "पंत, वाऽऽऽघ" असे दचकून ओरडत असे.



## ५ स्वयंवर

वडगांवचा पाटील मोठा शौकीन गृहस्थ. तसल्या डोंगराळ भागांत त्याचा केळीचा मळा होता. एक उत्तम घोडा, ५–२५ कुत्रीं, लांडगा, कोल्हे, माकडे अन् भरीला एक वाघीण असा शिकारखानचा जमवून ठेवला होता त्यानें मळ्यांत. पण या राणीच्या बागेंतील राणी स्वत: एका बांबूच्या पिंजऱ्यांत कोंडलेली होती आणि इथले झरे–टेकाडे अन् जंगले ही खरीखुरी होती. हेंच तर मोठें धोक्याचें होते !

वाघीण पिल्लूं असतांपासून पाळली होती. मामा त्या गांवीं मोजणीला येतांच त्यांनीं सल्ला दिला कीं, हें ठीक नाहीं मारून

टाक, नाहीं तर सोडून तरी दे जंगलांत." जंगली जनावरांना आकुंचित जागेंत बंदिस्त ठेवणें मामांच्या नीतींत बसत नव्हतें.

जंगलच्या वाघांची संख्या साठ काय अन् शंभर काय, कितीही असायला मामांची हरकत नव्हती. वाघ जर माणसांच्या किंवा पाळीव जनावरांच्या वाटेस न जाते तर मामांनीं जन्मांत वाघ मारला नसता एकही.

रामजी पाटील म्हणजे हिंमती माणूस. त्यांत वात्सल्याची भर. मुलासारखी वाढवलेली वाघीण सोडून देववेना व मारणें तर कल्पनेंतही सहन होईना ? पिंजराच जरा आणखी मजबूत करूं अशीं आश्वासनें दिलीं पाटलानें अन् विषय तेवढाच राहिला.

मामांचाही मुक्काम लांबला मोजणीच्या अनंत भानगडींनीं.

आतांशा रोज रात्रीं केळीच्या मळ्याजवळ एक वाघ घिरट्या घालतांना दिसूं लागला होता. मधून मधून त्यानें आवाज दिला की वाघीणही अस्वस्थ होऊन साथ देई. पिंजऱ्याच्या बाजूवरही झेंपा घेई ती. एक दोनदां वाघ मळ्यांतहि शिरला होता. पण राखणदारांनीं हुसकला त्याला.

दुपारी अकराचा सुमार होता. जेवण-खाण आटोपून मामी मळ्यालगतच्या ओढ्यावर धुणं धुवायला गेल्या होत्या मुलांना घेऊन. धुणें आटोपत आलें तशी मामींनीं रामूला हुंदडणें आटोपून जरा पुढें व्हायला सांगितलं. धुतलेले कांहीं पिळे 'काळी' च्या खांद्यावर दिले व आपणही राहिलेला पिळा खळबळून पाठोपाठ निघणारच होत्या.

रामू नाचत हुडकत पुढें चालला होता. काळी खांद्यावरचे पिळे अन् पायांतला परकर सांवरीत, डोळे उन्हामुळें किलकिले करीत कुठेंतरी पहात चालली होती, आपल्या गतीनें मागाहून.

इतक्यांत वाघाची डरकाळी आली. भर दुपारीं अन् गांवाच्या अगदीं जवळ वाघाचा आवाज ? सर्वांचाच थरकाप झाला. मामा अन् रामजी पाटील चावडीवर होते. ते आवाज ऐकून उभे रहा-तात तोंच मळ्यांतल्या वाघीणीचें प्रत्युत्तर ऐकूं आलें. हें ऐकून पाटील " वरात निघते लेकीची " असेही म्हणाले.

मामा बंदूक उचलून तयार होतात तोंच रामूनें धांवत येऊन, " माईला वाघानें खाल्ली " अशी बोंब केली. पण घालवायला वेळ नव्हताच. रामू पुढें अन् बाकीची मागें अशी ओढ्याकडे धावली.

पहातात तो काळी धुणें घेऊन रखडत येते आहे. खांद्या-वरचे पिळे वांकडे तिकडे, एक सुटा होऊन पाठीकडून जमिनीवर लोळतो आहे, ओल्या परकराला खालून भरपूर माती लागली आहे, अन् चालण्याची रीत स्वतःशींच कांहींतरी बडबडत, खालीं मान घालून, गुंगलेल्या माणसासारखी.

मामी ओढ्यावरुन तिच्याकडे शून्य नजरेनें पहात होत्या — हातांत अर्धवट पिळलेला पिळा तसाच लोंबतो आहे अन् आवरून धरलेले ओचे पाण्यांत पडल्यानें पूर्ण भिजले आहेत अशा स्थितींत.

" काय रे राम्या, काय सांगत होतास ? " मामा गरजले.

" म — मा — मगा मी पाह्यला वाघ तिच्यावर उडं घालतांना, म्हणू ऽ ऽ न ... "

मामींनी पुढें होऊन काळीला विचारलें, "काय ग!"

"अं. वाघ आला इकडून, मी वाटेंतच होतें."

"मग?"

"मी बसून गेले पटकन् अन् वाघ गेला डोक्यावरुन् उडी मारून!"

ह्यांत वाघानें जानकीवर उडी मारीपर्यंतचा भाग मामींच्या दृष्टींत आला अन् अपेक्षित परिणामानें त्यांना वाटलें, अन् जसें कांहीं दिसलेंच त्यांना, कीं तिला वाघानें खाल्ली असें. घाबरण्याचें अन् ओरडण्याचेंही भान राहिलें नाहीं त्यांना; मग त्यांना समोर भाची खुशाल आहे हें तरी कसें दिसावें?

पाटलाची लेक मोडक्या पिंजऱ्याच्या मांडवांतून आपल्या संसारांत नांदायला गेली होती!



# ६ दुहेरी शिकार

चावडीसमोर खूप गर्दी जमली होती. सारा खेडेगांवच जमा झाला होता म्हणा ना! येतां जातां चावडीवर सांपडणाऱ्या कृष्णा गुराख्याच्या पोरापासून तो पाटलाच्या घरच्या पडदानशीन

मंडळीपावेतों सर्वजण घोळके घोळके करून उभे होते. मधूनच एखादा वाल्या चांभार नाहींतर सोमा बुरुड येई, तो सरळ लोटालोटी करीत चावडीच्या ओटयाजवळ जाई, आणि वासू भटाच्या अन् शिवा महाराच्या खांद्यावर हात ठेवून, मान उंचावून, लोकांच्या कोंडाळयाच्या अगदीं आंत डोकावून पाही. त्याकाळची कडक शिवाशीवसुद्धां विसरण्याइतका कांहींतरी भयंकर प्रकार होता खास. मधूनच एखादा प्रेक्षक आश्चर्याचे वा खेदाचे उद्‌गार काढी, अन् जवळच्याच माणसांवर प्रश्न डागी.

चावडीच्या बैठकीवर एक मनुष्य पालथा टाकला होता. त्याच्या पाठीवर दोनही खांद्यांपासून तों कमरेपर्यंत ओरबाडे दिसत होतें. बेशुद्धच होता तो माणूस. त्याला शुद्धीवर आणण्याकरितां उपाय म्हणून जवळच बसलेला वैदू त्या जखमा मोठ्या करून आणखीच रक्त काढीत होता. तोंडानें आपल्या कर्तृत्वाच्या बढाया मारून, जादुगाराप्रमाणें वटवट करीत, फुकट वेळ घालवीत होता. गर्दी इतकी केली होती बघ्यांनीं कीं त्या रक्तस्राव अन् वैदूगिरीतूनही तो शुद्धीवर येताच तर हवा नसल्यानें बेशुद्ध झाला असता. भरीला वाघाची घाण! कारण जवळच एक वाघाचं धूडही पडलं होतं अजस्त्र.

'मोजणीदार आले!' आजूबाजूची मंडळी कुजबुजत बाजूला सरली. प्रत्यक्ष येण्यापूर्वींच मामांच्या आवाजानें ही हालचाल झाली होती. ते अजून दूरच होते.

ही चाहूल लागतांच सर्व मंडळींवरचा मंत्रप्रभाव लुप्त झाला. पाटलाकडच्या मंडळींनीं पदर सावरले; वासू भटानें सोम्याचा हात झिडकारून टाकला; सोम्यानेही एकदां शिवा महाराकडे

तिरस्कारानें पाहिलें अन् शिवासुद्धां, वेसकराच्या पायरीप्रमाणें दूर आवाराच्या कोंपऱ्यांत सरकला. ज्याच्या आवाजानें खडक-वाळ-वंटातल्या सुसरी-मगरीही डोहांत डुबकी घेतात तो वैदूही चूपचाप झाला.



"साल्याला सांगत होतो ही रीत नाही शिकारीची म्हणून. जंगलच्या राजाशीं मर्दाईनें सामना द्यायचा असतो. ही नामर्दांची दगाबाजी कामाची नाहीं. कुत्र्याच्या मौतीनें मरशील! जीवच दिला जाणूनबुजून तिथं पंत काय करणार?" शब्दांतलें वजन अन् गती, पावलांतही उतरत होती. समोरच उदेभान पाटलाला टाकलेला पाहून पुन्हा पंतांना चेव आला.

"अरे कां आठवली अवदसा तुला ही! कोणी मर्द मिळाला नाहीं बरोबर न्यायला? सगळे मेले अन् हा दीडपैशा सांपडला तुला? निदान ज्याची शिकार केली त्याला पहायला तरी जगायचं होतस. अरे . . ."

पण उदेभान बेशुद्ध पण जिवंत आहे ही गोष्ट इतक्यांत पंतांच्या लक्षांत आली. ताबडतोब हुकूम गर्जून औषध पाण्याची (अन् अगोदर मोकळ्या हवेची) त्यांनीं व्यवस्था केली. गांवच्या न्हाव्याला बोलावणं पाठवलं, वैदू व न्हावी दोघेही धंदा एकच करीत तेव्हां त्यांची नेहमीच खडाजंगी!

पण मलमें, पाला, ओढे अन् जखमा बांधणें चालूं असतांच उदयभानू "अस्तभानू" झाला.

पाटलाला शिकारीची गोडी मामांमुळेंच लागली. बंदुकीचा पक्का नेम जमेपर्यंत पंतांबरोबर जाऊन पाहिलें ; अन् धीर आल्या-वर स्वतंत्र शिकारीहि केल्या किरकोळ. पण वाघाच्या शिकारीला थोडातरी धोका अवश्यतर पत्करायची तयारी हवी ; तशांत त्याला एक गुरुजी भेटले. त्यांनीं अगदीं बिनधोक शिकारीची पद्धत शिकविली. ती अशी –

जंगलांत वाघाच्या वावरण्याच्या आसपास धोरण राखून खड्डा खणायचा, त्यांत बसून गोळी मारण्यापुरते झरोके ठेवून, खड्डा पूर्ण झांकावयाचा अगदीं जमिनीसारखा करायचा. वाघाला आमिष बांधलेलें जनावर झरोक्यातून सहज दिसेल असें बांधायचें अन् वाघ येण्याची वाट पहायची. त्यांत फायदा हा कीं, वाघ अजिबात बेसावध असणार अन् गोळी चुकली तरी ती कोठून आली याचा वाघास अंदाज लागायचा नाहीं. म्हणून धोका नाहीं. पण त्यांतच वाघांचा सामान्य मूर्खपणा गृहीत धरला जातो. फाजील सुरक्षितते-मुळें अवधानही रहात नाहीं अन् संकट ओढवतें.

जनावर बांधून शिकार करायची म्हणजे वाघ कधीं येतो कधीं येतही नाहीं. कधी जोडी येते. अशावेळीं हालचाल कोंडून अन् आकुंचित जागेंत दबून रहायचें. दृष्टीचा टप्पा अगदीं मर्या-दित – कधीं वाघाला श्वासाच्या वासानें संशयही येतोंच अगदीं पक्की खात्री न झाली तरी ! शिकारी तर चढाई करूं शकतच नाहीं अन् वाघ नुसत्याच जागेभोंवतीं घिरट्या घालतो. एवढ्यांत जर कां कांहीं नक्की सुगाव्याचें घडलें तर ..

पण 'असं कुठं झालंय' अशा विश्वासावरच उदेभाननें ही पद्धत सुरक्षित म्हणून स्वीकारली.

पंत परोपरीनें सांगत कीं 'दगा होईल,' पण तीन चार शिकारी यशस्वी झाल्यानें पाटलाला पंतांच्या सांगण्याचं विशेष कांहीं वाटलं नाहीं. पंतांनीं 'निदान तरवार तरी राहूं दे जोडीला', असा आदेश दिला. त्यांत कांहीं बिघडत नव्हतें म्हणून उदेभाननें तोहि पाळला.

जनावर जंगलांत आलें असल्याची बातमी लागतांच पाटील तयार झाले. पण मारलेल्या गुरांचे जवळपास ठाण मांडूनहि जनावराचा नक्की ठिकाणा लागेना. जनावर भलतेंच हुशार दिसलें.

वाघाची नेहमींची रीत म्हणजे शिकार मारली कीं, जिवंत असतांनाच गळ्याच्या धमनींतून रक्त पिऊन घ्यायचें; नंतर हवें-तर पित्ताशय वगैरे चांगले भाग खायचे. पोट भरलें कीं, तसेंच



टाकून पुनः तिथेंच खायला यायचें राहिलेलें. वाघाच्या शिकारी जवळ जवळ सर्व यामुळेंच साधतात.

पण हा वाघ एकाच दिवशीं २–३ गुरें मारी अन् नेमका शिकारी नसे त्याच गुरावर खाना उरकी! त्यामुळें ३-४ वेळां वहिवाटीची तयारी फुकट गेली.

शेवटीं पाटलांना आपली सुरक्षित रीत सुचली, अन् बरोबर " शिकार " पाहायला म्हणून जोडीदार न्यायचा ठरवला. हे जोडीदार शब्दशूर होते. त्यामुळें त्यांना जोडीला कधीं नेऊं नये असेंच सगळ्यांचें मत होते. शिकारीला जाणाऱ्या सगळ्यांनाच संयम हा अत्यंत आवश्यक गुण आहे. तासन् तास न कंटाळतां, झोंप न येऊं देतां, नेहमींच्या संवयी व व्यसनें यांना आवरून, वाट पाहणें, थोडाही चिडखोरपणा न उसळूं देणें, म्हणजे तपश्चर्याच असते. तिथें असला जोडीदार काय कामाचा? पण पाटलांचा आत्मविश्वास आतापर्यन्त दुर्दम्य झाला होता. नुसते पाहायला काय हरकत आहे, असा त्यांनीं निकाल दिला.

चांदण्याच्या अंधुक प्रकाशांत २–२॥ तास घालविल्यावर वाघाची चाहूल आली; पण अपेक्षेच्या विरुद्ध दिशेनें. हळूहळू पाचोळ्यावरचा दबत्या पावलांचा आवाज दूरदूर गेला. शिकार हुकणार असेंच वाटलें त्यांना, पण जराशानें झरोक्याचे बाजूनें वाघाची चाहूल लागली. वाघानें रेडकावर झडप घालतांच पाटलांनीं गोळी घातली !

गोळी लागतांच वाघानें जी डरकाळी मारली ती प्रचंडच होती. पाटलांचे स्नेही बसल्या जागेवरूनच 'बापरेऽ' करून उठले अन् त्यांचें डोकें खड्ड्यावर झांकण टाकलेल्या झोंपाळ्यावर आपटलें. दोनही आवाज ऐकल्यावर त्या जखमी जनावराला नक्कीच सुगावा लागला.

खराऽखरा दोन्ही पंजांनीं वरचें गवत अन् झोपाळा ओरबाडून वाघानें पाटलाला खांद्याजवळ धरून घुसळत घुसळत खड्ड्याचे बाहेर ओढलेही !

वाघाला झालेली जखम मोठीच होती, तरी त्यानें संतापानें पंजांनीं ओरबाडे काढले अन् तिथेंच दोन हात अन्तरावर आचके देत पडला.

पाटलाला तलवार चालवायला अवकाश व जागा दोन्ही मिळाली नाहींत. दोस्त महाशय तर इतकें गळाठले होते कीं तलवार उचलायचेही त्यांना सुचलें नाहीं; मग वाघाला भोसकायचें दूरच राहिलें.

वाघाची जखम फारच जबर म्हणून स्नेही बचावले.

शेर अन् शिकाऱ्यांनीं परस्परांची शिकार केली !

---

★

# ७ काळा वाघ

★

'मुठ्ठ्यांच्या मळ्यांत ' काळा वाघ' आला आहे, अन् त्यानें किरण्या गवळ्याचा हेला मारला, म्हशी चारायची सोय कांहीं उरली नाहीं,' अशी आवई गांवभर वाऱ्याच्या वेगानें पसरली.


सातपुड्याचे आसपास वाघ गांवाजवळ किंवा कधीं कधीं गांवांत येणें ही कांहीं नवलाची गोष्ट नाहीं. वाघांच्या गोष्टी,

संवयी अन् खऱ्याखोटच्या गप्पा खूप पसरल्या आहेत तिकडे; पण दिवाळीच्या टक्करींत तालुक्याभरांत अजिंक्य ठरलेला हेला मारणारा प्राणी म्हणजे बडंच प्रकरण! म्हशींच्या सुद्धां वाटेस जात नाहीं वाघ सहसा.

कोणी म्हणे गेंडा असावा. गेंडा शिंगानें भोसकतो अन् त्याच्या नाकावर एक किंवा दोन शिंगें असतात, ही फक्त पुस्तकीच माहिती! पाहिला होता कोणी गेंडा ?

गवा असावा असेही कोणीं म्हणत पण किरप्याचें पोर म्हणते 'काळा वाघ आहे. अन् शेपूट दहा फूट लांब आहे.' भेदरलेच होतें तें पोर, तें काय धड सांगणार? प्रत्यक्ष पहाणारा कोणी नसल्यामुळें तर्काला सर्व जंगलच मोकळें.

दुसऱ्या दिवशीं रंगू गवळ्याचा हेला मेला. त्याच्या राखोळ्यानें मात्र सर्व प्रकार पाहिला होता. म्हशी रानांत शिरल्यावर थोड्यांच वेळांत एक रेडा डुरकत आला. लागलीच रंगूचा हेला लढाईला सज्ज झाला, जनानखान्यावर हल्ला म्हणजे काय गोष्ट!



पण टक्कर अन् लढाई निमिषांतच संपली. त्या रानटी प्राण्यानें क्षणांत रंगूच्या हेल्याला फरफर मागें रेटलें अन् तो जरा तिरका होतांच पोटांत शिंगें खुपसून आंतडीच बाहेर काढलीं.


म्हशी केवळ संवयीनें परत आल्या. नव्या हेल्यानेही त्यांना वेशीपर्यंत सोबत केली; पण माणसांची जादा वर्दळ भासतांच तो वेशीबाहेरच्या मळ्यांत शिरला. तेथलें राताळ्याचें पीक उध्वस्त करीत अन् शिगांनीं जमीन उकरीत मजेंत चरत राहिला. गांवांत उगाचच दोन तट झाले एक म्हणे वाघ आहे, तर दुसरा म्हणे हेलाच आहे मोठा. किरप्या म्हणे चुकार हेला असायचा नाहीं; त्याचंही बरोबरच होतं म्हणणं. असलें जनावर कां टक्करीची हौस असणाऱ्या जवानांच्या नजरेंतून सुटलं असतं कधीं ? त्याचा हेलाच १२०० रुपयांचा होता मुळीं त्या काळांत ! अर्थात् ती किंमत आजच्या ६००० रुपयांइतकी होती.

दोनच दिवसांत शेकड्यांनीं नुकसान झाल्यावर मुठ्ठे समोरच राहाणाऱ्या मामांकडे येणं साहाजिकच होतं. असलं प्रकरण पोलीस घेतील अन् हळुहळू हलेल, त्यापेक्षां मामांचा झटपट् निकालच सोयीचा होता सगळ्यांना.

वाघाचीच शिकार असती तर पानाला चुना लावण्याइतकी सहज गोष्ट होती मामांना. पण हें प्रकरण और होतं. संवयी माहीत नाहींत अन् ताकद तर प्रचंडच दिसते आहे. प्राणी कोणता आहे हेंही नक्की ठरायचं होतं. तेव्हां या संन्याशाचं लग्न शेंडीपासूनच पहावं लागणार. व्याघ्रस्मृति तर रद्दच करावी लागली तात्पुरती; अन् महिषपुराणाचं पहिलं नमन देखील नव्हतं हाताशीं.

म्हशींबद्दल चुरस हेल्यांच्या टकरींच्या मुळाशीं असतें, तेव्हां ४–५ म्हशी राताळ्याच्या बनांत सोडून लांबून झाडावरून टेहेळावें असें ठरलें. ह्या टेहेळणींत जनावर म्हणजे पुष्ट हेलाच असें ठरलें. पण किरप्या अन् रंगू दोघांनाही असलं जनावर आपल्या दावणीला हवंच असा लोभ सुटला.

भलत्या मोहांत पडूं नका असं दोघांनाहीं सांगून पाहिलं लोकांनीं. मामांनी तर पाहिलाच होता गवा. ' जनावर जंगली आहे, तोंड ओबडधोबड चिचोळें, कपाळ एकदम् वर आलेलें, असें आहे ; कामास येणार नाहीं, ' असं त्यांनींही सांगितलं. रंग्याला तें पटलं पण किरध्या कांहीं वळेना. मग एक वृद्ध गवळी म्हणाला, " तुला दुधाचा धंदा करायचा कां म्हशी खेळवायच्या ? "



" वा: हें काय बोलणं झालं ? दुधाचा धंदा तर करायचाच, पण चांगला हेला टकरीही खेळतो. "

" अरे पण हें जंगली हेलगं बिनदुधाच्या पारड्या करील तयार, मग काय म्हशींच्या टकरी लावीत फिरणार जंगमावाणी? "

तें बिनतोड अर्थशास्त्र झालं. मग शिकारीला अडथळे राहिले नाहींत. पाठलाग करून शिकार होणारच नव्हती, अन् म्हशीचं आमिष दाखवून शिकार करायला मामा तयार नव्हतें. महाभारत

कांहीं दररोज नाहीं स्फुरत. तेव्हां मर्दासारखा सामना द्यायचा ठरवलं मामांनीं.

पण १२ नंबर बंदुक म्हणजे माऱ्याचा पल्ला थोडा. रायफल नव्हतीच; पण असती तरी सामन्याला उपयोगी नव्हतीच ! १०-५ गोळ्या खाऊन शिकाऱ्याला (अन् इतर सांपडतील त्यांना) लोळवूनच मेलें तर मरायचें जनावर ! बंदूक अन् तरवार एवढेंच घेऊन मामा निघाले एकटेच. तेव्हांच मामींनीं, 'उगीच धाडस करूं नये' असें चाचरतच म्हटलें. पण मामा कडाडलेच "बेहिम्मत आंधळी शिची, अभोण्यालाच वाघापुढें टाकून दिली असती.... ." इत्यादि. मामी आतापर्यंत पूर्ण आंधळ्या झाल्या होत्या. अन् आंधळी हें त्यांचें विशेषनाम अन् सर्वनाम बनवलें होतें मामांनीं.

मामांच्या समोर रडायची सुद्धां हिम्मत नव्हती मामींना, तेव्हां त्या पेटंट शस्त्राचा उपयोगच नव्हता.


बरोबरच्या लोकांनाही हें मामांचें धाडसच वाटत होतें. पण मामांनीं योजनापूर्वक धोरण ठरवलें होते. उगाच कोणाचाही जीव धोक्यांत घालावयाचा नाहीं, हें तर त्यांचें सूत्रच होतें. पण स्वतःच्या बाबतींतली सुरक्षिततेची त्यांची कल्पना वेगळीच असे. हातांत त्यांचा सोडगा असला म्हणजे वाघ अंगावर येऊं देणें, त्यांना सुरक्षित वाटे अगदीं.

मुसंडी मारून येणारा प्राणी नेहमींच वेगांत अन् सरळ येणार तेव्हां चटकन् आडोसा घ्यायला मोठेसें झाड जवळ असलें, तर बचाव अन् शिकार दोन्हीही साधणार होतें; निदान दाट संभव होता.

तेव्हां असें झाड अन् वाऱ्याची हवी ती दिशा यांचा शोध करीत मामा निघाले. आडोसा सांपडल्यावर अंगावरून जनावराकडे वारा जाईल अशा रीतीनें थोडावेळ उभे राहिले. लगेच गव्यानें डुरकणी दिली. अन् मान खालीं करून मामांच्या दिशेनें धांव घेतली ....

लगेच गोळी घालणें शक्य होतें पण इष्ट नव्हतें; तेव्हां गोळीच्या जोराच्या टप्प्यांत स्वारी येतांच मामांनीं डोक्यावर गोळी मारली; पण गवा जणूं काय दुप्पट वेगानें मुसंडी मारून आला. आतां धडकणार... इतक्यांत मामा झाडाआड झाले आणि अवघ्या एका हातावरून, आडव्या बाजूनें, कुशींत गोळी मारली. ह्या गोळीनें मात्र काम पुरें केलें. अनधिकृत आक्रमणाचें प्रायश्चित्त प्राणत्यागानें घेतलें त्यानें.

नंतर कळलें कीं हा गवा तापी नदी ओलांडून म्हशींमागें आला आणि वळवाच्या पावसानें नदी भरल्यानें अलीकडे अडकला. गांवोगांव भटकत होता तो. राताळाच्या बनांमुळें जरा स्थिरावला अन् म्हणून शिकारही साधली !



# ८




आमचा मुक्काम तेव्हां साकोऱ्यास होता. नांदगांवच्या जवळच आहे तें. एक लहानसा ओहोळ आहे गांवाच्या बाहेरच. नांदगांव तालुका म्हणजे बरडांचाच भाग आहे बराच. मेंढरांच्या उपयोगी खुरटं गवत हाच काय तो मुख्य वनस्पति-प्रकार. पलीकडें जवळ गिरणा नदी आहे. तेथपर्यन्त जरा जंगल आहे. नांदगांवला नदी आहे तेव्हां थोडी हिरवीं झाडं दिसतात, पण एकंदरीत बरडच.

तिथें मुक्काम असतांना गांवांत भीतिग्रस्त वातावरण होतं. जवळच्याच रस्त्यावर रात्रीं बाराचे सुमारास एक 'भूत' येतं अन् तें पहाटेपर्यन्त वाटसरूंना दिसतं अशी आवई उठली. भुतानें कोणाला झपाटलं नव्हतं, पण तें पाहून बेशुद्ध झालेलीं किंवा परत थरथरत आलेलीं माणसं मात्र बरीच होतीं. हें कळतांच मामांनीं प्रथमच "कमहिंमत" माणसं असा ठरावही केला.

पण हिंमतराव पाटलाच्या हिंमतीबद्दल मामांचीही खात्री झाली होती. एका शेतकऱ्याच्या अंगावर आलेल्या बिबट्याला हिंमतीनें विळ्यानें जखमी करून पळवणें हा इतिहास त्याच्या मागें होता. त्यानेंही जेव्हां भूत पाहिल्याचें सांगितलें तेव्हां 'हा प्रकार तरी काय आहे' हें पहाण्याचें मामांनीं नक्की केलं.

हिंमतरावाच्या बोलण्यांत आलें कीं, "नांदगांवला जात असतांना अर्ध्या मैलावर चिंचेच्या झाडापाशीं पावसाची सर येतें तसा सरसर आवाज आला. अन् थोड्याच वेळांत भूत झाडाखालींच आलं. सर्वत्र काळभोर. मी तेथेंच थांबलों तर तेही थांबलें, मग मी मागें आलों तर तें झाडाखालींच माझ्या दिशेनें आलें. पण जवळ आलें नाहीं. तें पुढे चालतें झालें. मीही त्याच्यापासून दूर चालत होतों. पहाटें नाल्याच्या कांठापर्यंत तें गेलें अन् एकदम दिसेनासे झाले. म्हणजे चिंचेच्या झाडापासून तर नाल्यापर्यंतच वग दिसतो त्याचा."

हिंमतसिंग कांहीं पळून आला नव्हता अन् बेशुद्धही झाला नाहीं. 'सर सर' आवाज येण्याची गोष्टही दोन तीन जणांकडून कळली होती. तेव्हां 'भूत खरंच असलं तर जाऊं या व पाहूं काय असतं तें, अन् सांपडल्यास देऊं फुंकून' असा विचार मामांनीं पक्का केला.

इकडे मामींची तिरपीट उडाली. तिनें मामांना सुचवून पाहिलें, पण मामा अस्सल कोंकणी शिवी देत अंगावर आले. ह्यापुढच्या वाघापुढें टाकून देण्याची खात्रीही त्यांनीं दिली मामीला अन् तोपर्यंत 'मोठा मळवट भरीत जा' असा उपदेशही केला. मामी तोंड उघडणार होती तरीही पण मामांनीं डोळे फिरवताच गपकन् तें बंद झालें.

अमावस्येची रात्र. अकरा वाजण्याचे सुमारास मामा खांद्यावर बंदूक अन् कमरेस तलवार लावून निघाले. वास्तविक भूतच असलें तर त्याला अतिमानुष शक्ति असणार अन् त्याच्यापुढें बंदुकीचा काय प्रभाव ? पण भुताचें सोंग घेऊन रस्तालूट करणारी एक टोळी पूर्वी एकदां ऐकली होती त्यांनीं, तसें कांहीं असलेंच तर हत्यारें उपयोगी पडणार होतीं.

पण तेवढ्यांत रामू मामांचे माग आला. आदल्या रात्रीं एका बिबट्यानें गांवाबाहेर जवळच गाढव मारलें होतें अन् त्याचें डोळे दिसले होते चावडींतून आतांच, तेव्हां भीति वाटतें म्हणून तरी मामांना परत बोलवावें म्हणून सितामाईनेंच रामूला पाठवलें होतें.

पण मामांनीं एकदां ठरवल्यावर ते काय असे वळतात ! त्यांनीं बंदूक रामूजवळ दिली अन् सांगितलं, "सितेला सांग बंदूक घेऊन जागायला अन् वाघ आला तर दे बार करून म्हणावं. मला तलवार पुरतें." सीतामाईला मामांनीं १–२ वेळां बंदूक उडवायला लावली होती. पण तेवढ्यानें काय होणार ? आणि त्यावेळची आठवण कांहीं गोड नव्हती. पहिल्यावेळीं मामांनीं पाठीला आधार दिला म्हणून, नाहीतर पडतच होत्या त्या खालीं. दुसऱ्या वेळच्या धक्क्यानें खांदा १५ दिवस दुखत होता. करायला गेले एक अन् भलतेंच झालें असें ताईला झालें. पण आतां उपाय नव्हता अन् मामांच्या ताकदीवर तिचा भरंवसाही होता.

चिंचेच्या झाडाखालीं पोहोंचताच मामांनीं निरीक्षण करण्याकरितां उभें राहून कानोसा घेतला. खरंच दुरून सरसर आवाज येत होता ! हळु हळू तो वाढत टपोरे थेंब पानांवर पडावे

एवढा वाढला. तो कमी कमी होऊं लागतांच एक काळी आकृति झाडाखालीं आली.

पण ती आकृति तिथेंच थबकली. मामाही उभेच राहिले. ती आकृति मामांच्या दिशेनें कांहीं येईना. थोडयावेळानें ती उलट दिशेनें चालूं लागली. अमावस्येचा काळोख अन् त्यांत झाडांची सांवली. ताऱ्यांच्या उजेडांत अगदींच अंधुक दिसे. पण नेहमींच शिकारीकरितां अशा उजेडांत बसावें लागे म्हणून मामांना कांहीं ती अडचण विशेष नव्हती. मामांनीं पाठलाग सुरूं केला सावकाश गतीनें.

येवढयांत आकृति दिसेनाशी झाली. सरसर आवाज अगदींच नाहीसा झाला होता. तेव्हां हें भूत इथेंच गुप्त झालें कीं काय ? असें वाटून मामा पुढे गेले जरासे. तिथें तर कांहींच नव्हतें. पण जरा मागें पहातां ५–१० हातांच्या अंतरावरच तें भूत दिसलें. तें चालत येत होतें पण मामांनीं तिकडे पाहातांच थांबले.

आतां उलटा पाठलाग सुरूं झाला. मामा पुढें अन् भूत मागें, मामा थांबलें कीं तें थांबें; चालायला लागले कीं चालू लागें, तेवढेंच अंतर ठेवून.

तेवढयांत मामा जरा आडबाजूला वळले, इतका वेळ लहान मोठा रस्ताच होता. हळूंच मागें पहातात तो भूत रस्ता न सोडतां तसेंच हळुहळू पुढें गेलेलें दिसले. लगेच मामांनीं पाठलाग सुरूं केला.

हें आलटून-पालटून ३–४ तास चाललें. आतां भुताच्या हद्दीचा नाला आला होता. भूत पुढें अन् मामा मागें असाच

पाठलाग चालला होता. भूत ओहोळच्याच्या पाण्यापर्यंत गेलें अन् एकदम " जयरामजीकी " म्हणत पाणी ओलांडून गेलें. भूत नाल्यापर्यंतच जातें नाला ओलांडीत नाहीं, असें मामांना तें पाहिलेल्यांनीं सांगितलें होतें. पण हें भूत नाला तर ओलांडतेंच पण वर रामाचाही जयजयकार करतें, हें आश्चर्यच! मामा तडक नाल्याकडे आले व तो ओलांडू लागले. भूत



कांहीं दिसत नव्हतें. पण तिथून आवाज आला 'क् क् कोण आहे?'

"घाबरूं नको मी आलों" नेहमीच्या आवाजांत मामा म्हणाले. मामांचा आवाज गाजलेला होता आसपास. उत्तर आलें, "राम राम तुम्हीं कां पंत सरकार, लई घाबरलों पगा मीं".

पांडू धनगर घोंगडी काढून तोंड धूत होता. त्यानें हें उत्तर दिलें होतें.

"अन् घाबरायला काय वाघ मागें लागला होता कां ?" मामांनीं विचारलें.

"वाघ नाय पण समंद लागला व्हता ना ! "

"अन् कुठें आहे तो ?"


"हा काय समूरच कीं" अन् पांडू जोरजोरांत हंसूं लागला. उलगडा असा झाला :— पांडूचीं मेंढरें शेताशेतांत, खतवण्याकरितां

वाघाची पाठ वळताच जनावरांनीं कालच्या सारखाच हलकल्लोळ केला. 'आज गडी असून हें झालं, तेव्हां गड्याचीच तर नाहींना चटणी झाली,' असें वाटून रंगोबाची तिरपीटच उडाली. गोठ्यांत जातों तो गडी नुसता स्तब्ध उभा आहे हातांत दिवा घेऊन !

आतांसारखे हरिकेन (प्रभाकर) दिवे तेव्हां नसत. तीन किंवा चार बाजूस कांचा अन् मध्यें रॉकेलचें धुपाटणें असतें, तसा गोडेंतेल, करंजीचें तेल, नाहींतर एरंडीचें तेल यांची दिवली.

गड्याला विचारतां त्यानें सगळा प्रकार कसा क्षणार्धांत झाला तें सांगितलें. जनावर फार हुशार आहे हें तर दिसलेंच. दुसरें दिवशीं माग काढण्यांत आला. जनावर मोठं पण बिबळं आहे अन् वाघीण आहे हें कळलं; पण मारलेलें जनावर पुनः खायला येण्याचा परिपाठ नाहीं दिसला.

आतां मात्र बंदोबस्त करायला हवाच होता. तेव्हां मामां-कडे निरोप गेला. वाघ सोकावलेला दिसला. पूर्वींच्या वासरांचा तर पत्ताच नव्हता, पण दुसऱ्या वासराचाही पुन्हा खाण्याच्या




दृष्टीनें कांहीं भाग ठेवलेला दिसेना. रात्रींच कोल्ह्या–कुत्र्यांनीं फस्त केलं होतं तें.

तेव्हां वाघ लगेच पुढच्या रात्रीं येण्याचा दाट संभव होता. पण गोठ्यांत शिरायला येतांना शिकार साधण्याचा संभव कमी होता. त्याची येण्याची अन् परतायची जागा मात्र ठरीव दिसली. तेव्हां बंदुक तयार ठेवून शेजारच्या धाब्यावरून शिकार साधायची शक्य तर गुरं धरायच्या आंतच, असं ठरलं.

वासरं मात्र घराच्या आंत पण गोठ्याच्या दरवाजाच्या जवळच बांधली दोन, अन् राहिलेली हलवलीं दुसऱ्यांच्या घरांत.

जसा कांहीं घड्याळ लावल्यासारखा वाघ आला ठरल्या वेळीं. त्याला अंदाज आलेला होताच वासरांच्या जागेचा. आंत उडी टाकतांच तो वासरांच्या बाजूला वळला. पण आज तिथें एक म्हैस होती बांधलेली. तेव्हां जरा लहानसर गाय धरायचा जणूं काय बेत केला त्यानें मनांत.




पण तेवढं अर्ध पाव मिनिट फार झालं मामांना. वाघाची मान वळते न वळते तोंच त्याच्या खांद्यांत गोळी घुसली मामांची. धडाड् आवाजाबरोबर जनावरांची धडपड, वाघाची डरकाळी, अन् गाईंचें हंबरणें यांची एकच धूम झाली.

वाघीण अगदीं दिवस भरलेली होती. कातडं काढतांना पिलंही निघालीं पोटांतून !

---

## १०



# राजे अन् दरोडेखोर

पटाईत वाघ अन् बिबळे हे दोन मामांच्या तत्त्वज्ञानांत वेगवेगळे प्राणी होते. पटाईत वाघ माणसांच्या अंगावर येणें हा अपवादच असे. पाळीव जनावरंही क्वचितच मारतो तो. माणसंच फक्त खाणारे वाघ हे तिकडच्या भागाला ऐकूनच माहीत असत. मध्यप्रदेश किंवा कुमावन ह्याप्रमाणें ती वर्षा दोन वर्षांनीं घडणारी घटना नव्हती.

त्याचं कारण भिल्ल – कातकरी हे असेल त्या हत्यारानें झगडणारे लोक होते. भिल्लांचे अन् कोळ्यांचे धनुष्यबाण धड होते तोपर्यंत. जव्हार अन् सुरगणासारखी राज्य, संस्थानंही होती त्यांचीं जवळच. कातकरी बायासुद्धां कमरेच्या कोयत्यानें महाग पाडीत शिकार वाघाला. अन् वाघ काय, जंगली जनावरं काय, माणसं काय अन् देवसुद्धां, सहज साधेल तेच गिळंकृत करतात. यज्ञांतसुद्धां बोकडच बळी देतात कीं ! !

पण बिबळ्या वाघ हा दुबळाच त्या मानानें. अन् शक्ति अन् हिंमत ह्यांची भरपाई तो दगाबाजी, धूर्तपणा यांनीं करतो.

कुत्रीं, गाढवं, शेळ्या-मेंढ्या, बायामाणसं, मुलं, एकटादुकटा वाटसरु, शेतीचे बैल यांजवर तो खुशाल हल्ला करतो. तेव्हां “ दिसेल तेथें ठेंचा अन् सुगावा लागला कीं उडवा ” हाच न्याय त्यांच्या बाबतींत लागू असे.

बिबळ्या वाघाचं लपण्याचं चांगलं ठिकाण म्हणजे पाणथळी जवळचीं झुडपं, चांगली ६–७ फूट उंच अन् सरळ वाढतात तीं. त्यामुळें ससांसारख्या प्राण्यांनाहीं आडोसा होतो अन् त्यांच्या वर जगणाऱ्यांनाही होतो ! मामांनीं ४–५ कुत्रें पाळले वेगवेगळ्या वेळीं, बिबट्यांचा माग काढून त्यांना हुसकायला. पण एक काळा कुत्रा फार प्रिय होता त्यांचा. तो एका धनगरापासून बच्चा असतांनाच आणला होता. सांखळी लावूनच ठेवीत अन् फिरवीत त्याला.



बिबट्याचा सुगावा लागला कीं त्याचें ठिकाण नक्की करायला फार उपयोगी पडे तो. ठिकाण समजल्यावर दृष्टीसच पडला पाहिजे वाघ झुडुपांतला, अशी कांहीं आवश्यकता नसे मामांना. आवाजावरून त्याचें नक्की ठिकाण अन् खांद्याच्या भागाचा अंदाज बरोबर घेऊन, एका गोळींत काम करीत ते.

एकदां संध्याकाळच्या सुमारास हातांत सोडगं अन् सांखळीला काळ्या असे मामा निघाले फिरायला. योग असा कीं, काळ्याला वास आला बिबळ्याचा. झुडपं थोडीच होती, त्यांतून त्यानें बाहेर पडतांना पाहिलंही त्याला. शिकारीचा कांहीं उद्देशच नव्हता. पण कुत्रा ओढ करायला लागला तेव्हां वहिवाटीप्रमाणें सांखळीसुद्धां मामांनी सोडला त्याला. काळ्याही



भुंकत भुंकत पाठीमागें लागला वाघाच्या. एकटचा कुत्र्याला कांहीं वाघ भीत नाहीं फारसा,पण माणूस आहे जवळ म्हणून तो यःपलायन करायला लागला.एक फर्लांग गेले ते. तेवढ्यांत काळ्याची सांखळी अडकली दगडांच्या फटींत. वाघाच्या तें क्षणांत लक्षांत आलं अन् तो उलट वळला.

मामा दूर होते ५००–६०० फुटावर, वाघ परत वळतांच ते धांवत निघाले पण तेवढ्यांत वाघानें काळ्याची पाठ दांतांत धरून चुरा केला तिचा. काळ्याच्या गळ्यांत कांटेरी पट्टा संरक्षणाला घातला होता. पण बिबळ्याही धूर्तच. त्यानें आपली उपजत बुद्धि वळविली परिस्थितीप्रमाणें.

आपण आपल्या हातांनीच कुत्रा बळी दिला हें मामांना फार लागले – दोन दिवस त्यांना जेवण गेलें नाहीं. अन् पुनः त्यांनीं कुत्रा शिकारीला कधीं वापरला नाहीं.

---

## ११ दृष्टिकोन ★ वाघाचा आणि माणसाचा ★

उन्हाळ्याच्या दिवसांत गारवा सर्वच प्राण्यांना हवा असतो, जंगली जनावरांना तर पाणीही नैसर्गिक मिळेल अशी जागा मिळाली तर हवीच असते. तेव्हां दुहेरी सोय झालेली पाहिली एखाद्यानें तर त्यांत कांहीं चूक नाहीं त्याची, निदान त्याच्या दृष्टीनें तरी.

पण माणसाची अन् त्याची दृष्टि जमावी कशी ?




लहान नाले उन्हाळ्यांत आटतातच पण त्यांतल्या त्यांत ज्यांना उंच दरडी असतात ते लवकर आटत नाहींत. त्यांना पावसाळ्यांतही पूर जास्त खोल पाण्याचे येतात. तेव्हां अशा नाल्यावर, लहान असले तरी पूल हवेत हें सर्वांच्याच लक्षांत येऊं लागले होते हळुहळू.

अशाच एका नाल्यावर पूल झाला होता आदल्या वर्षी. पावसाळ्यांतही पुलामुळें छान सोय झाली. त्यामुळें कधींकाळीं गैरसोयही होईल ही स्वप्नांतसुद्धां कल्पना येणार नाहीं कोणाला! पण ती झाली खरी.

पुलामुळें त्याच्या मोरींतून जाणाऱ्या पाण्याला चांगलीच धार आली पावसाळ्यांत. त्यामुळें खालच्या बाजूला चांगलाच खड्डा झाला अन् एरवी जें करंगळीसारखे पाणी वहायचं पाव-साळ्यानंतर अन् उन्हाळ्यांत तर गुप्तच व्हायचं त्याजागीं ते चैत्रांतसुद्धां पुरुषभर पाण्याचा डोह अन् वाळू उपसली तर चांगलें पाणी मिळूं लागले होते आतां. रस्त्यानें जाणाऱ्या गाड्याबैलांचीही अनायासे सोय झाली. बैलांना पाणी पाजायचें, भाकर-तुकडा

खायचा, जरा लवंडायचं कीं, पुढें सरकायचं, ही वहिवाट पडायला लागली हळुहळू. एका सोयींत दुसरी नकळतच झाली.

पण एके दिवशीं एका गाडीचे बैल नालाजवळ आला तसे हटून बसले. पुढें सरकायचं नाकारलं त्यांनीं. गाडीवानानें शेपूट पिरगाळले तर त्यांनीं फिसकारून माना घुसळल्या, पण पाऊल पुढें टाकायचं नांव नाहीं. तेवढ्यांत दुसरी गाडी मागून आली, तिचेही बैल तसेच ! तेव्हां गाडीवानांना कांहींतरी बिनसलें आहे हें नक्कीच समजलें. समोरून येणारी गाडी पुलापर्यंत आली पण तिचे बैल तर उधळलेच गाडी वळवून. गाडीवानांनीं खालीं उतरून इकडे तिकडे पहायला सुरुवात केली. तेवढ्यांत वाऱ्याबरोबर नाकाला समजलेच एकाच्या कीं वाघ आहे जवळपास !

दिवसा उजेडीं अन् वाघ म्हणजे नवलच. पण गाड्यांत माणसें पुष्कळ होती एकूण. होत्या त्या काठ्या-दांडको घेऊन जरा पुढें सरकलीं तीं, थोडी हिंमत करून. तेवढ्यांत पुढच्या माणसाला दिसलाच वाघ.

पुलाच्या सावलींत एक पटाईत वाघ आरामांत झोंपला होता–पाय पसरून. आपल्या झोपेनें माणसांना कांहीं व्यत्यय होतो आहे ह्याची जाणीवही नव्हती त्याला !

पट्टेवाली स्वारी पाहिल्यावर सगळ्यांचें धैर्य गारठलेंच उन्हाळ्यांतही. परत जाऊन तर भागत नव्हत, अन् पुढें जाण्याची तर हिंमत नव्हती. तेव्हां राजाची लहर जेव्हां लागेल तेव्हां जाणें, तोपर्यंत मुक्काम तिथंच ! पेंढ्या पेटवायची तयाची ठेवून वाट पहात राहिले सारे. आणखी २–३ गाड्याही आल्या सोबतीला. पण सगळ्यांनीं मिळूनसुद्धां पुढें जाण्याची हिंमत झाली नाहीं.

२-२॥ वाजतां उन्हें फिरली अन् राजश्रीच्या अंगावरच उन्ह आलें. तेव्हां झोंप पुरी करून, हातपाय ताणून, एक दीर्घ जांभई दिली त्यांनीं. तेवढ्यांत माणसांचा वास अन् गलबला लक्षांत आला. ' आतां इथें थांबणे पुरें ' असे जणूं ठरवून स्वारीनें साऽकाश रस्ता सुधारला नाल्यांतूनच वर.



ही हकीकत आजूबाजूच्या खेड्यांत कळली. प्रथम अपवाद वाटला तो. पण ती वहिवाटच झालेली दिसली. ११ ते ३ रस्ता हमेशा बंद झाला ! ! मग मामांचेकडे वर्दी आली. पण त्यांच्या तत्त्वज्ञानांत वाघानें माणसांना दखल दिली नव्हती. "कोंबडीचं काळीज आहे ह्याचं " त्यांनीं शेरा मारला. पण सिंहाचं काळीज सगळ्यांनीच कुठून आणायचं ? अन् कोंबडीच असो कीं माणसाचं, पण एकेकाला एकच असतं अन् ते वाघांना आवडतंही. तेव्हां धर्मराजाप्रमाणेंच सत्याला जरा मुरड घालावी असें मामांना

सुचविण्यांत आलें. त्यांनाही पटलें तें. पण झोंपलेल्या वाघाला मारणं कांहीं त्यांना रुचेना. निदान त्याला दृष्टि पडण्याची संधि तरी दिली पाहिजेच असें ठरवलें त्यांनीं.

बारा वाजतां मामांचा मुक्काम पुलाच्या बाजूच्या दरडी-वर पडला, बंदुकीच्या नळचा भरून अन् तलवार आडवी ठेवून ते बसले नीट. येतांनाच २–४ दगड घेतले होते उचलून.

‘ कशाला हे, ’ जागल्यानें विचारलें.

‘ वाघाला उठवायला ! ’ पिंजऱ्यांतल्या वाघाला बायकापोरे खडे मारतात. मोकळ्या वाघावर ते मारणारे वेगळे असतात.

मामांनीं डाव्या हातांत बंदुक घेऊन उजव्या हातानें एक दगड भिरकावला पाण्याकडे. त्याचा आवाज झाला ‘ डुबुक् ’ करून; पण वाघाची झोंप उडवायला तें कांहीं पुरलं नाहीं. पट्टया वाघ असतो दाट झाडींतला प्राणी, अन् तिथें काटक्या पडणं, फळं पडणं असे विविध आवाज होत असतात. लहानसहान प्राण्यांनीं सावध रहायचं असतं, अन् त्यांना बिचकवायला ते पुरतातही.


तेव्हां मामांनीं दुसरा दगड थेट वाघालाच मारला. दगड होता बारीकच पण त्याच्या मागें मामांचे स्नायू होते. ‘ ऊठ् ’ मामा त्याबरोबरच कडाडले. झणका बसल्यासारखा लागला तो दगड, अन् झोंप उडाली त्याची. त्यानें समोरच पाहिले मामांकडे.


मामांनीं पहिली गोळी कपाळांतच मारली त्याच्या, अन् ‘ ख्यांव ’ करून तो उसळला, तशी दुसरी गोळी त्याच्या छाता-डांत बसली. समोरच्याच माणसावर झेंप टाकण्यास अवसरच मिळूं दिला नाहीं त्यांनीं वाघाला !


---

# भाग २ रा

आजीच्या शिकारकथा आवडल्या ना तुम्हांला ? ह्या कथांचे मुख्य नायक, त्या सांगणाऱ्या आजींचे मामा होते. ते इ. स. १९१९ पर्यन्त हयात होते. त्यांचें नांव श्री. **प्रल्हाद अनंत कोपरकर** त्या जुन्या काळच्या खानदेशांत, म्हणजे पूर्व व पश्चिम खानदेश आणि नाशिक जिल्ह्यांतील कांहीं तालुके, येवढ्या मोठ्या भागांत ते जमीन-मोजणीदार होते. कथांतील बराचसा भाग कळवणचे आसपासचा आहे. नवी लागवडीची जमीन व आजुबाजूला सह्याद्रीचे फांटे व जंगल यामुळें त्या भागांत वाघांचा उपद्रव फार असे; पण मामांनीं बरेच वाघ मारून उपद्रव कमी केला होता. त्यांना त्या कामगिरीबद्दल बक्षिसेंही मिळालीं असती. वेळोवेळीं स्थानिक अधिकाऱ्यांनी व लोकांनीही ती स्वतः होऊन देऊं केली होती !









माझा व त्यांचा परिचय, मला समजूं लागल्यावर वयाच्या ७ व्या वर्षीच झाला. ते व्हांपर्यंत तरी मारलेल्या वाघांची कातडीं दुसऱ्यांनींच उपटली होती. पण वाघाची १०–२० नखें, घुवडांच्या नख्या, दुबारी बंदुक अन् तलवार येवढें पाहिलें आहे मी. एका रामोशी दरोडेखोरानें दिलेलें बक्षिस मात्र त्यांनीं घेतलें होतें. तें म्हणजे एक बंदूक व तलवार. ती घेण्याचें कारणहि " मर्दाची दोस्ती " हें होते.

कथा सांगणाऱ्या आजी त्या वेळीं फक्त ८ वर्षांच्या होत्या. आई माहेरपणास भावाकडे जाई तेवढ्याच काळांतल्या समक्ष आठवणी. त्यावेळीं सगळें कुटुंब म्हणजें मामा, मामी, एक मुलगा, बहीण अन् भाची एवढेच होते. मामी फार भित्र्या होत्या. त्यामुळें मामांचा बहिणीवरच विश्वास जास्त होता.

कथांमध्यें परिचय झालेलाही आहे अन् होईलहि जास्त.

# १ मामांशी ओळख

अगदीं लहान म्हणजे वयाच्या तिसऱ्या वर्षी जळगांवीं मामांकडे आम्ही गेलों होतों. पण एका जुनाट घराची अन् पाठी-मागच्या गल्लींत उंचावर दार असल्याची एवढीच आठवण होती तेव्हांची. पण वयाच्या सातव्या वर्षी जास्त 'पहेचान' होण्याचा योग आला. माझ्या धाकट्या दोघा भावांनीं जरी ह्या संकलनांत साहाय्य केलें असलें तरी त्यांना कांहीं मामांचा परिचय होऊं शकला नाहीं. अडचणच तशी मोठी, म्हणजे ऽऽऽ, तेव्हां त्यांचा जन्मच झाला नव्हता !

१९१६ साल, अंमळनेरला नुकतीच बदली झाली होती.. अन् आमचे, म्हणजे माझेच, अद्याप कोणी गल्ली-दोस्त झाले नव्हते,

आई स्वयंपाक घरांत पुरुण्याच्या खटपटींत होती. अन् बहिणी तिला मदत करीत होत्या. मी नुकतीच अंगणांत गल खणली होती. अन् तेवढ्यांत् ध्यानांत आलें कीं, विटीदांडू कांहीं सामानांतून निघाला नाहीं. तो शोधून काढण्याच्या खटपटींत कांहीं सामान धडधडलें. अन् बहिणींची 'तुझी ती हनुमानगिरी राहूं दे' असा शेरा ऐकून घ्यावा लागला. सीतेचा शोध सोपा असावा त्या अडगळींतून विटीदांडू शोधण्यापेक्षां ! आईला सांगण्यांत अर्थ नव्हता. तेव्हां 'आतां उद्योग काय करावा' अशा विचारांत सदऱ्याच्या बाहीला नाक फुरकन् पुसून मी उभा राहिलों. तसा आईनें उद्योग दिला असता, पण तें 'काम' झालें असतें.

तेवढ्यांत मला कोणीतरी 'फुर्रर्र' करून मागून वेडावून दाखविलें. मी मागें वळून पहातों तों एक बुवा घरांत गेला सुद्धां !

"माई ऽऽऽ, आम्हांला खायला ऽऽ".

एवढा मोठा बुवा, माझ्यासारखाच माझ्या आईजवळ खायला मागतो अन् ओळखीचाही नाहीं तो.

आई त्याला म्हणत होती. "जरा थांब रामू. एवढं जातं पुरतें अन् घेतेंच भाजणी भिजवायला."

चला, आत्तांतरी कांहीं खायला मिळत नाहीं आपल्याला. मी बाहेर झटकणारच होतों, इतक्यांत तो बुवा पुनः अगदीं माझ्या मनांतलेंच बोलला.



"लौकर दे" आमच्या घराच्या धुणें वाळत घालायच्या दांडयांना हात धरून रामू मागें पुढें झुलत होता.

"लौकर तर घे तो कोपऱ्यांतला ऊंस", आई म्हणाली. ते लाकूड काय उपयोगाचें? असाच आविर्भाव होता तिच्या बोलण्यांत. हाय! ज्या उसावर आठ दिवसांपूर्वी पाटोळचाला घेतल्यापासून आमचा डोळा होता, अन् गाडीभर सामानांत चार दिवस जो बेपत्ता होता; तो ऊंस शेवटीं वाळून दारामागेंच पडला होता तर!

रामूनें तो दारामागून काढला. जाडचा बांबूसारखा दिसत होता तो, अगदीं सुका. पण रामूनें तो काढला, आई धुणें पिळायला धरीत असे तसा धरला, अन् मला हुकूम फर्मावला, 'ए शेंबडचा वाटी धर खालीं." वाटीभर रस निघाल्यावरच पिळा पिळण्याचें थांबवलें त्यांनीं.

अर्थात् अशा महापुरुषाची ताकद भयंकरच असायची. मी त्याला विचारलें. "वाघाला पाडाल कां कुस्तींत तुम्हीं ?" रामूनें तर कांहीं लक्ष दिलें नाहीं माझ्या प्रश्नाकडे पण आईच म्हणाली, "तो नाहीं खेळला वाघाशीं कुस्ती पण त्याचा बाप खेळला आहे."

"कोण ग आई", क्रमांक दोनची बहीण. क्रमांक एक कामांतच असत जुंपलेल्या.

"अग आपले मोठे मामा."

आई नुकतीच आमच्या मामाकडून परतली होती, तेव्हां मामा-मामांत भेद दाखवायला हाच मार्ग होता. मला कांहीं ह्या नात्याची उमज पडली नाहीं.

मी माझेंच घोडें दामटलें पुढें.

"वहाग केवढा मोठ्ठा अन् कुस्ती कशी..."

पण आईनें 'कट्' असा (त्यावेळच्या) दिग्दर्शकांच्या पद्धतीनें निर्णय घेतला. "पुरे पुरे, सांगेन मग झोपतांना. आधीं चिखल आवरायला लाग मला."

कधीं कामाला हात न लावणारा मी (चार बहिणी होत्या कीं मजुरीला) पण त्या आश्वासनानें अन् लवकर होणाऱ्या थालिपिठाच्या आशेनेंही, मातकामासाठीं घेतलेला बत्ता धुवून-पुसून नेऊन ठेवला जागच्याजागीं अन् कमरेवर हात ठेऊन जाहीर केलं "झाऽऽलं ऽऽ."

संध्याकाळीं आम्ही सर्वच मोठ्या मामांकडे गेलों. 'द्वारकी आली आहे," मामा गरजले. मामी आंधळ्या झाल्या होत्या. आम्ही सर्वच स्वयंपाक घरांत गेलों. मामा बोलत होते आईशीं अन् आम्ही बघत होतों नुसते. तेवढ्यांत माझ्या मोठ्या बहिणीनें 'उईऽ' करून कपाळाला हात लावला.

"काय झालं ओरडायला? झोंपल्यासारखी आ वासून बसली होतीस तर जागी केली." मामा, मोहरी गोटीसारखी समोरच्या ताटावर मारीत म्हणाले. ताटावर तडाड् असा आवाज झाला तिचा.

मामांनीं मोहरी गोटीसारखी कपाळावर १२ फुटांवरून मारली होती अन् कपाळाला बारीक खड्डा पडून लाली आली होती.



# २ शिकारी आणि तत्त्वज्ञान

मामा तत्त्वज्ञ होते, हें सांगूनसुद्धां खरें वाटावयाचें नाही. तत्त्वज्ञ म्हणजे सर्वांगास भस्म लावलेले, लांब दाढीचे, सात्त्विक लोक. प्रत्येक वाक्यांत एक दोन शिव्यांचे अलंकार गुंफणारे पटवे हे कां तत्त्वज्ञ असणार ? ह्या कणखर म्हातारबुवांचें अन् तत्त्वज्ञानाचें जमायचें कसें ?

पण तरीही मामांचें स्वतःपुरतें तत्त्वज्ञान होतें. अन् विशेष म्हणजे तें शिकाऱ्याचें तत्त्वज्ञान असूनही, सध्यां जिचा ढोल बडवितात त्या मानवतेवर आधारलेलें होतें.

मामा स्वतःच्या बैठकींत बसले होते. डाव्या हातांत चिलीम होती अन् तीवर काथ्याच्या दोरीची राख दिसत होती. ते दिवस नशाबंदीचे नव्हते. मामा रोज चवलीभार गांजा ओढत असत.

"डोंब, कसाई, कोंबडीच्या काळजाचे साले." मामा गरजले. शिव्या तर नेहमीच्याच बोलण्यांतल्या होत्या. पण ही चढती भांजणी पराकोटीपर्यंत गेली होती. 'बेहिंमत'ही मामांच्या शिव्यांपैकीं सर्वोच्च होती. हिंमत नसणें यासारखा गुन्हा नव्हताच जगांत त्यांच्या तत्त्वज्ञानांत. दरोडे



खोरसुद्धां 'मर्द माणूस' म्हणून दोस्त झाला होता ना !

तेव्हां आज कांहींतरी भलतेंच बिघडलें होतें खास !

मामांचे डोळे लाल झाले होते पण रागानेंच, गांजानें नाहीं. तो तर नेहमींचाच होता. तो चढूं न देतां ओढणें हें मर्दाचें लक्षण होतें. मर्दांचा शोक होता तो.

मेहेरबान कलेक्टरसाहेब बहादूर शिकारीची हौस पुरवायला साकोऱ्याच्या रानांत आले होते. बेरंग होऊं नये म्हणून बरोबर तरबेज शिकारी हवेतच ! मोजणीदार तर हक्काचा गुलाम, त्याला नाहीं हुकूम करायचा तर कोणाला मग ?

मामांना जरी 'सरकार' बरोबर हजर रहाण्याचा "हुकूम" होता तरी तो कळवला गेला सौम्य शब्दांतच. निरोप सांगणाऱ्याला धाकधुकच वाटत होती ना !

पण मामांनीं बसल्या बैठकींतूनच उत्तर दिलें, "शेळ्या कापायचा धंदा नाहीं माझा."

मामांच्या पहिल्या शब्दाला ओटीशेजारी असणारा वेसकर, शेवटच्या शब्दाला कुंपणाबाहेरच पोहोंचला होता. वाघाच्या शिकारीचा अन् बकऱ्या कापायचा संबंध कोणालाच समजेना. मचाण बांधून, शेरडूं–पारडूं–बांधून शिकारीचें कोडकौतुक पुरविणारांना मामा नेहमींच 'कसाई' म्हणत असत.

गांगजी नायकानें, हाक्यांना धीर द्यायला मामा नाहींत असें पाहिलें, तेव्हां तो स्वतःच बोलवायला निघाला. गरजवंत पडला ना ? उद्यां वाघाऐवजीं साहेबाचीच शिकार झाली तर ? आग लागायची सगळ्या भिलवाडीला; नुसती शिकार हुकली तरी कंबक्तीच होणार होती त्यांची ! अन् कलेक्टरांची हौस

मामांविना अडत होती, असं थोडंच होतं. गोमेचा एकादा पाय लुटला तर कसचं लक्षांत येणार ?

पण वनवासीयांच्या हिशेबी गोष्ट निराळी होती. हांके-करण्यांत गमवायला साहेबाजवळ पुष्कळ गुलाम होते, पण त्यांना एकेकाला एकेकच जीव होता ना ?

हांकेवाल्यांच्या जिवाकरितां म्हणून मामा शिकारींत सामील झाले, मोठ्या मिनतवारीनें. गांगजी नायकाला पुष्कळ उलटच्या-सुलटच्या गोष्टी ऐकाव्या लागल्या. पण तो गप्प राहिला मुत्सद्दे-गिरीनें; अन् मामांच्या दप्तरीं गांगजीची नोंद 'हिंमतवाला' अशीच होती, ती पुण्याई कामाला आली. मामांच्या तोफखान्या-पुढें टिकून, आपलं म्हणणं पटवायचं काम इतरेजनांचं नव्हतंच !

शिरस्तेदार बैठकीवर तक्क्याला रेलून पडले होते. गप्पा-वजा हजेरी होत होती एकेकाची.

"काय गंग्या ! फार मिजास करीत होता तुझा सांखळी-धन्या, पण आणला कीं नाहीं साहेबानें धडपडत. आज राज्यकर्ते आहेत म्हणावं; रामावतारी वर मिळाला आहे ना त्यांना ? काय करतो पंत तुझा त्यांच्यापुढें ? "

"साहेबानं नाहीं आणला. गांवकऱ्यांकरतां आले पंत." गांगजी जरा रोषांतच उत्तरला. पंत त्याला नाईक म्हणत अन् कुठचा शिळपट शिरस्तेदार 'गंग्या' म्हणतो ह्याचा त्याला रागच आला जरासा.

"क्याय्, क्याय्" तोंडांतला पानाचा तोबरा अन् रस ह्यां-मुळें बोबडे बोलत अन् 'पिचक् थ्थू:' करीत शिरस्तेदार विचारते झाले.

३२८५०

मास्तरही चावडींत आले होतेच. त्याकाळीं मास्तर म्हणजे गांवचा वजनदार माणूस असे. आजचीं दीन मेंढरें अशी दशा व्हायला २०–३० वर्षांची ‘सुसंस्कृति’ अन् ‘लोकशाहीची खरबड’ हवी होती भरीला.

“गांवकऱ्यांच्या करतां म्हणून पंत आले शिकारींत” मास्तरांनीं फोड केली. “हें कसं काय?” जगांतलं कांहीं आश्चर्य घडलं असं दर्शवीत शिरस्तेदार म्हणाले.

“वाघानें माणसाला त्रास दिला नाहीं तर मारूं नये त्याला असं सांगतात पंत. हौस नाहीं करीत ते शिकारीची.” मास्तरांनीं वर्गाला शिकवावें तशा पद्धतींत सांगितलें.

“नसतेंच करायची अशी हौस दीड दमडीच्या कामगारांनीं. इंग्रजांनीं करायचा हा शौक. हाः, हाः हाः! काय नाईक! काय पाटील!” शिरस्तेदार उद्‌गारले.

पण ह्या वनचरांकडून सुसंस्कृत होयवांसारखी साथ मिळेना! तेव्हां शिरस्तेदारांनीं दुसरा चुरचुरीत विषय घेतला गप्पा छाटायला.

पण असिस्टंट शिरस्तेदार म्हणजे मोठा जिज्ञासू माणूस. त्याला शिरस्तेदारी मिळवायची होती अन् तिला आवश्यक त्या गुणांची माहितीही झाली होती. त्यानें मास्तरांशीं गोलगोल गप्पा मारून मामांच्या नकाराची हकीकत काढून घेतली. कान चावायचाच धंदा मुळीं! तेव्हां १२ तासांच्या आंत शिरस्तेदारांकडे रिपोर्ट!

“तो मास्तर काय काय स्तुती करीत होता त्या पंताची, भाटच जसा कांहीं, हेडमास्तरच करणार आहे ह्याला. तो पंत तर

माजोरी मुलखाचा! म्हणतो काय, "वाघ उपयोगी असतो, हरणं खातो म्हणून. अन् तो मास्तर हो! कुठल्याशा पुस्तकावरून गणित सांगत होता कीं, "वाघांनीं हरणं अन् ससे खाल्ले नसते तर शेतांतून एक दाणा हातीं येता ना!"

"पोरांसमोर वटवटायची खोड, येळकोट रहातो काय?" शिरस्तेदारी शेरा.

"तर काय; मला शिकवायला लागला कीं, वाघ हांकलून आणायला न् मारायला कांहीं मोठं शौर्य नाहीं लागत. हातीं आलेला बेसावध वाघ सोडून द्यायला तसंच दिलदार मन लागतं." असिस्टंट पाघळले.

"वा: रे दिलदारीचा कांदा; वाघ म्हणजे काय महाराजा, नुसत्या कातड्यावर बढती मिळते; आहांत कुठें;" शिरस्तेदारांनीं 'थू: त्येच्या जिनगानीवर' असल्या थाटांत पिचकारी टाकली.

---

# ३ राजाची जात

साकोऱ्याच्या रानांतले ओढे–नालेही महाराष्ट्रांतील इतर नद्यांप्रमाणेंच उन्हाळ्यांत कोरडेठंण होतात. विश्वेश्वरअय्यांचें पुण्यक्षेत्र चणकापूर धरण अद्याप व्हायचं होतं. कुठेतरी एखाद्या

लहानशा डोहांत मात्र बारा महिने पाणी असायचें. अर्थात् त्याभोंवतीं आठही काळ हिरवी गर्द झाडी अन् त्यामुळें भरदुपारीहीं गार दाट छाया असायची.

अशाच एका डोहाची जागा दोन टेंकडयांमध्यें अरुंद घळींत होती. डोहाच्या एका कडेला तर टेकडी अगदीं येऊन भिडली होती गुडघे मोडून, मान लववून पाणी पिणाऱ्या उंटासारखी. दुसऱ्या बाजूला जरा मोकळी १०-१२हातांची उतरण अन् मग दाट झाडी होती. उन्हाळ्यांत या पाणवठ्यावर आजुबाजूच्या जंगलांतील सर्व प्राणी पाणी पिण्यास येत असत. कधीं कधीं भर दुपारींहि वाघ दिसायचें तिथें. मानसिंग पाटलानें मामांना एकदां सुचविलें, "जनावरं अशीं नामांकित दिसतात म्हणतां ..."

मामा अन् मानसिंग निघाले "वाघ पाहायला."

टेकडीकडेच्या दरडीवर एका मोठ्या झाडाआड दबून बसून गंमत पहायची असं ठरवलं त्यांनीं. पलीकडच्या उतरणीवरून जनावरं येत पाण्यासाठीं. हाताशीं बंदुका होत्याच.

हळूहळू छोटींमोठीं जनावरं येऊं लागलीं. मोर, कोल्हे, डुकरें, लांडगे, तरस पाळीपाळीनें. सूर्य बराच कलल्यावर वाघ यायला लागले. इतर जनावरांची दबकत भित्री चाल अन् वाघांचें डुलत डुलत लहरीनें चालणें; गुलाम अन् राजे यांच्यांतील फरक होता तो !

जोडीजोडीनें, एकेकटे, पिलांसह वाघीण असे येऊन गेले बरेच. पांच वाजायचा सुमार झाला, अंधार पडणार लवकरच तेव्हां निघावं असाच विचार येत होता मानसिंगच्या मनांत.

हो, नुसतं बघायचं काय ? इतकीं येऊन गेली एखाद सहज लोळ-वतां आलं असतं.

कांहीं क्षण असे जातात तोंच अनभिषिक्त राजाच्या आग-मनाची ललकारी एका माकडानें दिली. थोड्याच वेळांत स्वारी दृष्टीसमोर आली.

पिवळ्याजर्द अंगावर रुंद काळेभोर पट्टे अन् प्रशस्त डौल-दार शरीर, निसर्गदत्त राजवस्त्रेंच तीं ?

झुलती अन् मंद सामर्थ्याची जाणीव करून देणारी चाल, गतींतील सफाई, सहज सभोंवार पहाण्याची ती रीत; गहिरी दृष्टि सर्वांतच सहकार्य अन् डौल होता. मामा अन् मानसिग मुग्ध होऊन पहात राहिले.



पाण्यापर्यंत वांकून, पाणी पिऊन जेव्हां स्वारी परत फिरली. तेव्हां मान-सिगानें चुळबूळ केली. शिकाऱ्याची चुळबूळ ? ती अगदीं कळत न कळतच असायची.

"काय पहातां, ठोकान् काय ? ..." मानसिगाच्या हाल-चालीचा अर्थ. मामांनीं फक्त तर्जनी वर करून डावा हात आडवा केला. ह्या खुणेनें त्यांनीं 'गप्प रहा, तुझा विचार पसंत नाहीं, तूं अडाणी आहेस. माझी तुला मनाई आज्ञा आहे.' इतका भावार्थ सुचविला. मानसिगही वरमलाच.

हळुहळू वाघ अन् हे दोघे ह्यांतील अंतर कमीकमी होत वाघ अगदीं समोर आडवा आला, अन् त्यासरशीं मानसिगाचा

हात एकदम बंदुकीवर गेला. त्यानें नेमही धरला. पण मामांनीं डाव्या हातानेंच नळी खालीं वळविली. उजव्या हातानें त्यांनीं स्वतःची बंदुक सांवरली.

गुरुवर्यांचा शिकारीचा मान पहिला, म्हणून मानसिंग स्तब्ध राहिला.

अंतर वाढूं लागलें तसा त्याचा जीव खालींवर होऊं लागला. वाघ आतां दृष्टिआड होणार म्हणून त्यानें बाजूला केलेली बंदूक उचलण्याकरितां चांचपले. त्यासरशीं एक ढेंकूळ गडगडत पाण्यांत पडलें. अन् त्या शांत वातावरणांतल्या त्या बारिकशा आवाजानें वाघाला चाहूल जाणवली अन् तो एका उडीसरसा झाडीआड झाला.

मानसिंग खट्टू झाला. त्यानें मामांना विचारलें, " माझ्या नशिबांतच नव्हती शिकार, पण तुम्ही कशाची वाट पहात होता पंत ? "



"तुला काय वाटलं मी उडवतोय वाघाला?" किंचित् आश्चर्य अन् अविश्वासामुळें मामांनीं विचारलें.


"तर! म्हणून तर बंदूक खालीं ठेवली मीं." मानसिंग उत्तरला.

दोन्ही पंजे डोक्यामागें अडकवून झाडांच्या शेंड्यांवरून पली-कडे पहात मामा बोलले, "जंगल वाघांचं अन् गांवठाण माणसांचं आहे. वाघ जंगलाचा राजा. दुसऱ्याच्या राज्यांत घुसून दरवडा घालायची रीत नाहीं माझी. धर्मयुद्ध आहे माझं. जंगलच्या राजानें गांवठाणकरांना त्रास दिला तर युद्ध. इतर वेळीं शेजारधर्माचा मान राखलाच पाहिजे. शिकार म्हणजे कांहीं खाटीकखाना नाहीं!"


शेळ्या कापायच्या धंद्याचा अन् शिकारीचा विरोध मानसिंगाला पक्का कळला तेव्हां.

त्यानंतर मानसिंग मामांचा 'पंतराजे' असाच उल्लेख करीत असे.

अन् शिरस्तेदारानें 'शिकार हा राजपुरुषांचा खेळ आहे," असें म्हटलें तें खरेंच ठरलें दुसऱ्या अर्थानें.



# ४




कुत्र्या - मांजरांचीं पिल्लें एकमेकांशीं खेळतांना किती मजेदार दिसतात. स्वतःचीच शेपटी तोंडांत धरण्याकरतां गरगर फिरणें, आपल्याच सांवलीवर भुंकणें, आपसांत भांडणें, गुरगुरणें, पुनः पुनः लोळणें, लुटकणें, शिवाशिवी, पिण्याची धडपड अन् त्याच्याकरतां ढुशा देणें, सगळंच कसं गमतीचं असतं.

सर्वच प्राण्यांचीं पिलं मोहक असतात. माणसाच्या बाब-तींत तार्‍हीं मुलं मात्र लोळागोळा असतात ४–६ महिनेपर्यंत; पण इतर प्राण्यांची फार लवकर खेळायला लागतात.

मग दोन पिवळींजर्द, नुकतेच डोळे उघडलेलीं पिलें जर तुमच्या वाटेंतच लुटुलुटु करायला लागलीं तर बघायचा मोह होईल कां नाहीं ?

पाऊलवाटेच्या कडेला करवंदीच्या जाळींतून दोन वाघाचीं पिल्लें आपसांत खेळत बाहेर आलीं. तीं आपल्या खेळण्यांतच गुंग

होतीं. जवळून माणसें जाताहेत अन् तीं भयंकर असतात, ही जाणीवच नव्हती त्यांना मुळीं.

मामा अन् पाटीलबोवा थबकलेच त्यांना पाहून ...

"धरतो पंत, छान आहेत."


"भल्या माणसा, आईसाहेब असतील जवळच अन् वेळच आली म्हणजे दोघी लक्ष्म्यांच्या कुंकवाचं बळ पुरायचं नाहीं. शहाणा असशील तर एकच उचल." मामांनीं सल्ला दिला. जरा झटपट करायलाही सुचवलं चुटकी वाजवून.

पाटलानें एका पिलाला उचलून पोटाशीं धरलं, ओरखाडे काढलेच तेवढ्यांत त्यानें. पण दोघेही निघाले झपाट्यांत. ५-५० पावलें जातात तों गुरगुरणें आलेंच कानावर.

"आली रे जगदंबा," मामा ओरडलेच.

वाऱ्याची दिशा चुकवून दुडकी लावावी अन् गांव-घर जवळ करावं असा विचार करून दोघांनींही धांव सुरू केली पण पिलाची माया अन् अगदीं ताजा माग. अशा पळण्यानें कुठं भागतं? दहा बारा पावलं टाकतात तों वाघीण तयारच. दोन माणसं पाहिल्यावर वाघीण जरा दबकलीच, अन् तशांत दुसरं दिलूं आपल्या लुट्-लुट् गतीनें येतंच होतं मागोमाग. त्याच्या गतीनें धांवावें तर दुसरें पिलूं हातचें जातें. अंतर जास्त राहिलें तर राहिलेलें पिलूंही जाईल कां? ही भीति. अशा द्विधा मनःस्थितींत चार उड्या राहिलेल्या पिलाकडे पुनः परत चार उड्या पाठलाग करायला, अशा चार दोन खेपा तिनें केल्याही. शेवटीं पिलू तोंडांत धरूनच पाठलाग सुरू केला, लाभ एवढाच झाला कीं, वाघिणीला हल्ला करतां येईना त्यामुळें.

गांव जवळ जवळ येत होता, तशी वाघिणीची स्थिति केविलवाणी होत होती. अंगीं सामर्थ्य असूनही परिस्थितीनें तिच्या-वर मात केली होती.



ती तशांतच घशांत गुरगुरत, दबकत दबकतच पाठलाग करीत होती.

"तूं हो पुढें. मी राहातों मागें. म्हणजे जरा जास्त अंतर राहील तुझ्या तिच्यांत. पण बघरे गड्या, विस्तवाशीं खेळ आहे. जर कां माझ्या बाजूनें पुढे निघून गेली तर मात्र विचार बघ." मामांनीं सुचविलें.

"अंः त्यांत काय मग, पिलूं मरीमातेला अर्पण करून धूम ठोकायची." पाटील उत्तरला.

"शाबास, शिवाजीचा वंशज आहेस खराच. हो पुढें मग."

डावपेंच लढवून पाटलांनीं पिलासुद्धां वाडा तर गांठला. वाघिणीच्या देखत जिवंत पिलूं आणायचा, अन् कोणतेंही हत्यार न वापरतां, हा पराक्रम कांहीं सामान्य नव्हता.

पिल्लूं तोंडांत धरून गांवांत शिरायचा कांहीं वाघिणीला धीर झाला नाहीं. शिवारापाशींच पाठ फिरवून ती जंगलांत उड्या मारीत निघून गेली.

पाटलाला तर "जिंकली बाणी" असेंच वाटलें. पण मामांना कांहीं लक्षण ठीक दिसेना. तिच्या एकदम परत फिरण्यांत अन् उडचा मारीत जाण्यांत, तोंडांतील पिलूं सुरक्षित लपवून परत फिरून सामर्थ्य वापरायचा विचार उघड दिसत होता त्यांना.

अन् संध्याकाळचे सुमारास लोटा-परेडीला निघालेली महिला-तुकडी तशीच परतली. वाघीण गांवाभोंवतींच घिरटचा घालीत होती.

पाटलानें मामांना आळवणी केली, "पंत, जरा बघा बयेला".

पिलू अन् एकच पकडण्याचा सल्ला देण्यांत मामा पाटलाचे सहभागी होतेच. पण पाठलागाच्या वेळची ती केविलवाणी मुद्रा अन् धडपड यांमुळें मामांना दयाच आली वाघिणीची. ते म्हणाले, "छट्! आपणच लूट करून पुनः गोळी घालायची तिला? साहेबाला जमतात तसलीं कामं. सरळ मर्दासारखं निस्तरावं नाहींतर मुत्सद्यासारखी माघार घ्यावी."

मुत्सद्दी हा शब्द एकाच वाक्यांत मर्दाच्या उलट वापरल्यावर पाटलाला झोंबलाच. वास्तविक बेहिंमत ही तर शिवीची परमोच्च कोटी होती. तेव्हा मामा तो मार्ग, अन् हिंमतवान् दोस्ताला सुचवतील, हा संभवच नव्हता.

पाटलानें पिलूं न सोडण्याचा ठाम निश्चय केला.

अंधारल्यापासून खुद्द गांवांतच संचार सुरूं झाला बयेचा. कुत्रं भुंकायचाच अवकाश कीं पाठोपाठ नरडं दाबल्याचा केंकाट आलाच ऐकूं गांवचा जागल्या अन् चोर, दोघांनाही संचारबंदी सगळेच घरांत गुडीचिप्प.

सकाळीं पिलूं परगांवीं लावून देण्याचा विचार केला पाटलानें. परगांव म्हणजे दोन कोसांवरचं खेडं. पण नेणार कोण तिथें पिल्लू अन् ही चूड दाखवून वाघ गांवांत बोलवण्याची बला कोण घेणार ?

दुसऱ्या रात्रीं पिलानें आईच्या डरकाळीला साथ दिली बारिकशा आवाजानें. नक्की ठिकाण कळल्यावर तिच्या घिरट्या वाड्याभोंवतींच मर्यादित झाल्या मग.

अजून माणसं मारली नव्हती वाघिणीनें; कारण बाहेर सांपडलींच नव्हती. पण तिची चीड अनावर होत चाललेली समजत होती. निव्वळ चिडूनच जनावरें मारलीं तिनें एक दोन

हें घरांत कोंडून घेणें, सर्व व्यवहार बंदी, ह्यांनी दोन. रात्रींतच सर्व गांव बेजार झाला. गांवकऱ्यांचा धीर सुटला अन् पाटीलही जरा डळमळलाच.

सकाळ होतांच पाटलाकडे पंच मंडळी आली.

"अरं मऽऽस झालं मर्दा ! पुष्कळच हिंमतीचा हैस तूं पण सारा गांव तर नाहीं तसा ?" एक सातारकर पाहुणे म्हणाले.

"अरं रामचंद्रानं सुद्धां तीन पावलं माघार घेतली व्हती खराशीं लढतांना. तुलाच काय वाटतं इकतं."

"नामर्दाईच्या गोष्टी..."

"कोण लेकाचा नामर्द म्हणतो ? एकट्याचा जीव असला तर मर्दाई. इथं तर गांवचा परश्न आहे. आडमाप मर्दुमकी शिपायांनीं करायची. गांवच्या राजानें नाहीं ! वेळवखत पाहून शिवाजी वानी पळ बी काढावा लागतो, त्यालाच सुतेंपन म्हणत्यात ! "

माघार तर सुरवातीलाच घ्यावीशी वाटली होती पाटलाला पण मुत्सद्दी ही शिवी वाटली होती. आतां गांवाकरतां म्हणून पिलू सोडून द्यायला पाटील तयार झाले.नंतरही वाघिणीनें त्रास दिला तर तिला पाहून घ्यायचं सामांनीं कबूल केलं.


" असा शहाणा हो जरा, " पंत म्हणाले.

" तुम्हीच तर शिव्या देत होता मुत्सद्दी म्हणून ...

पंतांनीं शहाणा माणूस म्हटल्यावर पाटलाला मूठभर मांस चढलं. पिलू सोडून देण्यांतला कमीपणा भरून निघाला.

मातेनें बालक परत मिळविले; पण दोन्हीही बाजूंनीं धर्म-युद्धाचे नियम पाळले म्हणूनच.

---




## ५

अजगर कांहीं इकडे सहज आढळत नाहीं. पहायला मिळत पण दाट जंगलांच्या आसपासच. कोंकणांत आणि कारवारच्या बाजूला अजूनही आहेत डोंगर पायथ्याकडे.

वस्तीच्या जवळ कांहीं सहसा तीं येत नाहींत. पण त्यावेळीं धुळें गांवाच्या बाहेर रस्त्याच्या कडेच्या एका झाडाच्या ढोलींत एक अजगर आलं कुठूनसं. माणूस सापाला भितो फार; अन् त्यांत प्रचंड जाडजूड अन् लांब साप असला तर जास्तच भिणार. तो विषारी आहे कां बिनविषारी आहे हें कोण पहाणार ?

तें अजगर जरी मोठं होतं तरी चपळ होतं. तें ढोलींतून निघून जवळच एका मोडक्या घराची भिंत होती तिच्या खालीं बिळांत जातांना दिसे कधीं कधीं. पण एकटादुकटा माणूस कांहीं हिंमत नाहीं करायचा त्या रस्त्यानीं जायची.

अन् जरी दोन चार जण असले अन् धरलंच एखाद्याला अजगरानें तर? बाकीच्यांनीं हिंमत धरली तरच उपयोग. नाहीं-तर प्रत्येकानें आपला जीव घेऊन पळून जावं अन् अजगरानें एकट्याला वेढ्यांनीं आवळून मारून सावकाश गिळावं !

वास्तविक मामांचा कांहीं त्यांत संबंध नव्हता पण 'लोक भित्रे असतात. उगाच भिण्यात अर्थ नाहीं.' असें मामांचें म्हणणें. त्यांचं ठीक होतं. ताकद होती त्यांच्यांत तेवढी. तरीही अजगराशीं कांहीं तिचा उपयोग नव्हता, पण हें मामांच्या कांहीं लक्षांतही आलें नाहीं.

एके दिवशी संध्याकाळीं ४–५ वाजण्याच्या सुमारास मामांना त्या रस्त्यानें जावें लागलें. झाड जुनें होतें, खूप मोठें होतें अन् त्याच्या ढोलीचें तोंडही दिसत असे रस्त्यावरून. मामा तिकडे पहात चालले होते. अजगर निघतांना दिसलं तर बडवूं सोट्यानें, हा विचार. पण अजगर रस्त्यावरच लोंबणाऱ्या फांदीवर बसले असेल ही कांहीं कल्पना आली नाहीं त्यांना. मामा फांदीखालीं

आले अन् अजगरानें त्यांच्यापुढेंच उडी मारली. वास्तविक अजगरानें उडी अंगावरच मारायची पण ती कशी चुकली देव जाणें.

अन् तात्काळ मामांच्या लक्षांत आला धोका. जर उडी अंगावर पडती तर अचाट ताकदीच्या माणसाचीहि विळख्यांतून सुटका झाली नसती. नुसती शेपटी तोंडांत सांपडली तर वाघाला-सुद्धां गिळून टाकतं अजगर, तिथें माणसाचा काय पाड ?

पण अजगराचें तोंड पायाला लागण्याचे अगोदरच मामांनीं पाय मागें घेतला अन् सोटा उगारला. अजगरानेंही डाव हुकला हें पाहून पलायन करायला प्रारंभ केला. पण झाडाची ढोल ज्या बाजूला होती त्या बाजूसच मामा होते. त्यामुळें त्यानें झपाझप पडक्या भिंतीकडे मोर्चा वळविला. हा दिशाबदल मामांना अपेक्षित नव्हता. म्हणून त्यांचा सोटा जमिनीवरच आपटला. पण अजगर बिळांत घुसेपर्यंत त्याच्या मागच्या भागावर एक फटका मारलाच त्यांनीं. पण अजगर गेलेंच तशा स्थितींत शेवटीं पळून.

मग मात्र मामांनीं हा धोका नाहींसाच करायचं ठरवलं. अजगर बिळांत गेला अन् बिळाला दुसरीकडे तोंड असायचं कांहीं लक्षण दिसेना. तेव्हां ते तेथेंच सोटा घेऊन बसून राहिले.

पण असं दिवसन् दिवस बसूनही अजगर बाहेर आलंच असतं असं थोडंच आहे. अजगराला सहासहा महिने अन्न न मिळालें तरी त्याचं कांहीं बिघडत नाहीं, तें कशाला येईल बाहेर उगीच.

मग फार वेळ बसून रहायचं नाहीं असंच मामांनीं ठरवलं. रस्त्यानें कोणी आलं कीं, त्याच्याबरोबर निरोप पाठवायचा असा


बेत करून त्यांनीं मोठ्यानें एकदोन हांका मारल्या. त्यांचा आवाज गेला दूरपर्यंत, पण एकट्या दुकट्यानें जाण्याची हिंमत नव्हती. दहा पांच माणसं जमून निघालीं तिकडे. त्यांची कल्पना कीं आवाज बंद झाला याचा अर्थ अजगरानें गिळलंच त्या माणसाला.

पण मामांनीं अजगर बिळांत घुसल्याचें सांगितलें. घरून बंदुकीची काळी दारू अन् तशीच सुरुंग, फुलबाजा, नळ्यांचीही दारु मागविली बरीच. मग ती हळुहळु आंत सारली जाईल तेवढीं, अन् सगळ्यांत वर सुरुंगाची अन् बंदुकीची दारु भरली ढिली. मग सर्वांना दूर व्हायला सांगून बीळ बंद करून बत्ती दिली तिला. सुरुंगाची दारु पेटली. तिला बाहेर रस्ता नव्हता. तिच्या धक्क्यानी दुसरी दारु खूप आंतपर्यंत जाऊन पेटली अन् अजगर नुसतं भाजून गेलं आंत.

भिंत पडकीच होती ती दोन दिवसांनीं कोसळली. तेव्हां घुशीच्या बिळांत अजगर मेलेलें दिसलें.

“पण आजी ही कांहीं वाघाची गोष्ट नाहीं.”

“हो, पण संकटं काय वाघांमुळेंच येतात कां? अन् मी तुम्हांला कोणच्या गोष्टी सांगायच्या म्हणाले होते? शिकारीच्या. मग ही शिकारच नाहीं कां?



# ६ तत्त्वज्ञान

सगळेच लोक कांहीं चांगले नसतात. "अजगर मारतांना सुरुंग लावून बिनपरवाना भिंत पाडली, सुरुंगाच्या दारुचा परवाना न घेतांच ती वापरली; ह्या गोष्टींचा पोलीस तपास करावा." असा अर्ज केला कांहीं उपद्व्यापी लोकांनीं. पोलिसांनाही कांहीं मोठी हौस नव्हती त्या चौकशीची. पण ते दिवस वेगळे होते. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत, वासुदेव बळवंतांच्या प्रयत्नांत, तसेंच इतरही कांहीं प्रकरणांत ब्राह्मणांवर परक्या सरकारनें करडी नजर ठेवावी असेंच सगळें घडलें होतें; तेव्हां पोलिसांनींही कलेक्टरकडे रिपोर्ट दिला कीं, "हें बेकायदेशीर झालं हें खरंच!"

पण कलेक्टर सिमकॉक्सच होता. बंदुकीचा परवाना ब्राह्मणाला अर्ज न करतांच दिला हा एक जरा चमत्काराचाच विषय होता झालेला. मुंबईहून विचारणाही झाली होती त्या-बद्दल. पण नंतर तो कांहीं उरला नाहीं. चालू प्रकरणावर त्यानें शेरा मारला, "पोलिसांनीं लोकांचा त्रास बंद तर नाहीच केला पण ज्यांनीं केला त्यांच्याविरुद्ध रिकाम्या तक्रारी सुरु केल्या आहेत. कायदे जनतेच्या संरक्षणाकरता आहेत. कांहीं चूक झाली असेल तर मी माफ करीत आहे." अर्जदारांना तर त्यानें समक्ष बोलावून असा दम दिला कीं तो त्या काळचे कलेक्टरच देवोत.

मामांनीं "शौक" म्हणून शिकार कांहीं सुरूं केली नाहीं. तेव्हां जनावर जर त्रास देत असलं तरच त्याची शिकार करायची उगाच 'कसाईगिरी करायची नाहीं' असा त्यांचा निश्चय. पण जसजशी जनावरांच्या संवयींची माहिती होऊं लागली तसतसा

त्यांना नियम वळवावा लागला. बिबळ्या वाघ हा अगदीं कारण नसतांही माणसाच्या अंगावर येतो. तेव्हां त्याचा सुगावा लागला कीं मारावा, वाट पाहूं नये हें त्यांना ठरवावं लागलं. पटाईत वाघ मात्र त्यांनीं उगाच मारले नाहींत.

पण शिकार म्हटली कीं धोका आलाच. तेव्हां कोणताही धोका विशेषतः दुसऱ्यांस पत्करायला लावायचा नाहीं हें त्यांनीं ठरवलं. नेम अगदीं पक्काच हवा म्हणून त्यांनीं एक छऱ्याची बंदूक घेतली. रात्रीं घुबड ओरडलं तर अंधारातच आवाजाच्या रोखावरून तें मारायची संवय त्यांनीं केली. ताकद तर पुष्कळच होती पण ती आणखी वाढावी म्हणून लांब स्प्रिंगांचे जोड आणवले. शिकारीस स्वतः बंदूक अन् तलवार याविना कांहीं न्यायचें नाहीं, कोणत्याही वाघाला दोन गोळ्या घालायच्याच, "दोन बार झालें नाहींत तर तपासाला रात्री यायचें नाहीं, शिकार पळाली असं समजायचं' अशी सक्त ताकीद गांवकऱ्यांना असे.

माचण बांधून ते शिकार कधीच करीत नसत. झाडाच्या फांदीवर घोडा करून बसायची वहिवाट होती त्यांची. माचण बांधली कीं दुसरे लोक शिकार पहायला म्हणून येण्याची गळ घालतात. शिकाऱ्याला जो संयम अन् अनंत काळपर्यंत वाट पहाण्याची (आणि तीही सावधपणें) तयारी असायला पाहिजे अन् असते, ती त्यांच्यांत कोठची असायला? दिलेली सूचना बिनचूक बिनतक्रार अंमलांत न आली तर मामांचा भयंकर संताप होई. स्वतःजवळ हत्यार असल्यानें संतापाच्या भरांत तें कोणावरही चालवले जाण्याचा संभव होता. तेव्हांपासून ते संतापले

म्हणजे ओरडून आरडून आकाशपाताळ एक करीत, त्याही उप्पर जास्त म्हणजे शिव्या. त्यांच्या कोशांत हिंमत नसणें हें सर्वांत मोठें पाप व गुन्हा होता. तेव्हां सर्वांत मोठी शिवी म्हणजे " बेहिंमत ", " कोंबडीच्या काळजाचा " ही. पण इतर शिव्याही कांहीं कमी नसत, तो काळच वेगळा होता. हाताखालच्या लोकांशीं शिव्याशिवाय बोलायचेंच नसे. आपल्याकडे शेतकरी, भिल्ल, रोजदार, मजूर, हमाल वगैरे लोकांना हळू बोलून समजतच नाहीं हें आपण पहातोंच. तशाच लोकांशीं सारा जन्मभर संबंध आल्यावर असें व्हायचेंच. पण त्यामुळें त्यांच्या हातून परक्यांना मार मिळण्याचे किंवा जीवही जाण्याचें टळलें. एखाद्या वेळीं त्यांनी मुलाला मारायला सुरवात केली तर तो अर्धमेला होई. बळकट असला तरच जगायचा त्यांच्या तडाख्यांतून. ते खुशीत आले अन् एक दिवस त्यांनीं त्यांचें तत्त्वज्ञान सांगितलें, तें असें—

(१) निजलेल्या जनावराला मारायचे नाहीं.

(२) नुसतें जखमी जनावर सोडायचे नाहीं.

(३) आपल्या बरोबर शिकारी नसलेले कोणीही न्यायचें नाहीं.

(४) दुसऱ्यांना धोका होऊं द्यायचा नाहीं.

(५) बिनहिशेबी धोका घ्यायचा नाहीं.

(६) शिकारीचे वेळीं, तसेंच हातांशी हत्यार असतांना, चिडायचें नाहीं.

(७) सगळ्यांपासून तुटकच वागायचें म्हणजे संतापाची संधीच नसते.

# ७ शिकारी नीतिपाठ

पारडूं बांधून शिकार करायची नाहीं हें पक्कं ठरवलं होतं मामांनीं; पण तें स्वतःपुरतंच. एखाद्या हौशी शिकाऱ्यानें मदत मागितली तर त्याच्या बरोबर मचाणावर बसणें अगदींच वर्ज्य नव्हतें त्यांना. त्यांतल्या त्यांत फांदीचा घोडा करून बसणेंच पसंत असे त्यांना. पण मचाणावर जास्त सुरक्षित वाटे लोकांना अन् शेजारीच मामा असणे हा मोठा आधार असे.

पण असे दुसऱ्यांबरोबर शिकारीला गेले कीं त्यांची कायम सूचना असे खेड्यामध्यें–"एकच बार झाला तर जनावर जखमी होऊनच पळालं आहे असं समजायचं अन् कोणी यायचं नाहीं शोधायला उजाडेपर्यंत. दोन बार झाले तरच शिकार झाली असं समजायचं अन् मशाली लावून यायचं शिकारीकडे."

शहरगांवचे शिकारी आले होते अशीच शिकार करायला. एकदा पारडूं मारलं कळल्यावर मचाणावर बसले. त्यांची बंदूक होती रायफल्. एक हजार रुपयांची होती ती त्या वेळच्या. मामांची बंदूक पाहून ते जरा नाराजच झाले. जड धूडच तें !


वाघ वहिवाटीप्रमाणें राहिलेलं शरीर खायला आला. शिकारी नवेच होते त्यांनीं नेम धरून गोळी तर झाडली. पण ती मर्मांत न लागतां मऊ मांसांतून आरपार गेली. वाघाला जखम चांगलीच झाली पण प्राणांतिक मात्र नाहीं झाली. त्यानें जी उसळी मारली ओरडत, तो पार पसार झाला झाडींत.

आतां मात्र कठीण प्रसंग आला. मामा जागेवरूनच गरजले, "कोणी येऊं नका पुढें. जनावर मोठं आहे अन् जखमी झालें आहे." जखमी जनावर म्हणजे खेडुतांना यमराजच वाटणार. लागलीच गांवांतील गुरं चारायला न्यायची नाहींत उजाडतां, हें कळवलं सर्वांना. शिकारी नीतींत, "जखमी जनावर कधीहीं सोडायचं नाहीं," असा नियम आहे. 'कोणी शिक्षा करील या भीतीनें नाहीं कोणी पाळत तो, नीतिनियम म्हणूनच तो पाळतात. खरे शिकारी कितीही सुधारले तरी जंगलाशींच (अन् मागासलेल्या लोकाशीं) त्यांचा सबंध. तेव्हां त्यांचे गुण लागायचेच कांहीं. नुसती परंपराप्राप्त सद्वर्तणुक हें अडाणीपणाचं लक्षण झालं आहे आजकाल. सुधारणेचें चिन्ह म्हणजे "शिक्षेची भीति नसेल तर कसलीच बंधनें न पाळणें अन् ती भीति चुकविण्याची शक्यता जर बरीच असेल तर फक्त तारतम्यानेंच पाळणें," हें आहे.

रात्रभर झाडावरील मचाणावर जागून शहरी शिकारी तर थकून गेले. सकाळी नीतिशास्त्राचा पाठपुरावा करायला त्यांचा उत्साह टिकला नाहीं. भलताच धोका होता त्यांत पुन्हा!

मामांनीं त्यांना सांगून पाहिलं कीं एकाच्या शिकारीवर दुसऱ्यानें हल्ला करणें हें शिकारी नीतींत येत नाहीं. पण ते स्वच्छ म्हणाले, 'खुशाल मारा तुम्ही तो वाघ तुमचीच शिकार समजून, कातडं द्या मला, म्हणजे झालं.'

नुसत्या कातड्याच्या शोभेकरताच शिकार करण्याची हौस करणाराकडून नीतिपालनाची अपेक्षाच नव्हती. तेव्हां स्वतःच जबाबदारी घ्यावी लागली मामांना.



हांके करून कांही जनावर हुसकणें शक्य नव्हतें. सगळीच बाजूची खेडी तयार झाली असतीं मदतीला. पण जखमी जनावराची वागणूक कधीच कांटेकोर अंदाजात बसत नाहीं. हाके करणाराच्याच अंगावर गेलं तें, तर सांपडतील तेवढ्यांचे मुडदे पाडील तें त्वेषांत. तेव्हां एक कुत्रा, २–३ भिल्ल अन् नाईक एवढ्यांनीच काम करायचं ठरलं. सर्वच लहानमोठें हत्यार घेतलेले होते. रक्ताचा माग १–१॥ मैल लागल्यावर जनावर झाडोऱ्यांत शिरलें होते. त्यांत कोणीही शिरून तपास करणें अशक्यच होतें. झाडोऱ्यांतून कोठपर्यंत तें गेलें असेल याचा अदमासही नव्हता.

इतक्यांत वाऱ्याच्या दिशेच्या उलट बाजूनें वाघानें हल्ला केलाच. सर्वच सावध होते म्हणून बरं, नाहीतर २०–२५ फूट हें अंतर जखमी वाघाला कांहीच नाहीं !

मामांनीं बार केला पण वाघ कोसळेपर्यंत पायाशीं पोहोंचला होता. दुसरी गोळी अगदी बंदूक टेकूनच मारली जणूं काय. वाघाची अखेर झाली तिनें.



हृया कथेचा नायक मारुती म्हसू भिल्ल हा पोस्टांत नोकर होता. सध्यां त्याचा मुलगा शंकर त्याच कामावर तेथेच आहे. त्यानें ही कथा विरदेल तोरखेडे प्रवासांतच सांगितली.

# ८ निकाली कुस्ती

मारुती भिल्ल म्हणजे पोस्टांतला साधा रनर. सिंदखेड्यां-तून टपाल न्यायचा तोरखेड्याला अन् दुसऱ्या दिवशीं तोरखेड्या-हून सिंदखेड्यास परतायचा. पण तो नांव कमावून होता. आजु-बाजूला त्याला कुस्तीला जोड नव्हती.

नुसतीच कुस्तीच्या डावपेचाचीही नव्हती मातब्बरी; पण त्याची ताकदही तशीच प्रचंड होती. तोरखेडे गांवालगत तापी नदी वाहाते. तापीच्या पायथ्याचे सर्वच नावाडी ऐदी आहेत वेळेवर नावा सोडायच्या नाहींत, पाणी तोडायला कष्ट करायचे नाहींत, वारा असला तर नावा जायच्या, नाहींतर बसा दोन दिवस. सरकारनें पैसे दिले तरी टपाल नेण्याची वानवा. जहा-गीरदारांचीं प्रस्थें मोठीं अन् नावाड्यांच्या धंद्यांत इतरांना कांहींच समजत नाहीं. मग त्यांनीं 'डॉक्टरगिरी' गाजवू नये तर कोणी ?

पण मारुतीला नावा सुटणें न सुटणें ह्याचा विधि-निषेध नव्हता. टपाल अगदीं सकाळीं निघायचे तोरखेड्याहून, नावाडी उठताहेत कशाला इतक्या लवकर ! अन् पुन्हां आदल्या दिव-साची दारू. पाणी पीत असत कां नाहीं कोण जाणें ?

पण मारुतीला नाव दिसली नाहीं कीं तो डोक्याला थैली बांधायचा, भाला दोन्ही बगलेंत पुढें घ्यायचा, अन् उतरायचा

संग्रहालय, ठा

नदींत. पूर–महापूर सगळे सारखेच त्याला. सपासप् हात मारले, कीं पैलतीर.



त्याचा भालाही तसाच होता. भरीव बांबूची कांठी अन् चकचकणारं पातं.

रस्ता म्हणजे, तापी ते विरदेलपर्यंत दुतर्फा निवडुंग अन् झाडोरा, मध्यें गाडीवाट. जमीन काळीभोर पण सहा मैलांत एक खेडं नाहीं. मग कुठचीं शेतं लागवडीची !

अर्ध्या अंतरावर एक गोटच्या-गोटयाच टेकाड आहे. त्याचं नांव दगडदेव. आसपास इतर कुठें बोरा-एवढा दगड नाहीं मिळत कावळा उडवायला मग दगड, देव कां नाहीं होणार ?

मारुती या कामावर येण्याच्या अगोदर डाकू धनसिंगाची लपायची जागा दगडदेव अन् त्याच्या पुढचा नाला ही असे. आजुबाजूचे सर्व रस्ते रोखले होते त्यानें वाटमारीच्या धाकानें.

अन् मारुतीला त्यानें एके दिवशीं अडवलं तलवार घेऊन. मारुतीनें त्याला सुनावले, “आतां सोडतोय तुला एकदां जातभाई म्हणून ! पण पुन्हां कधीं माझ्या ह्या रस्त्याला दखल दिली कोणालाही, कीं एका धनसिंगाचें तीन करून टाकीन.” बोलण्या-

प्रमाणें करण्याची खात्री दिसल्यावर विरदेल–तोरखेड रस्ता बिन-घोक झाला सगळ्यांना.

असा हा सार्थनामा मारुती बगलेंत भाला मारून आरा-मांत, पण जलद गतीनें जात होता. थैली लहानच होती. ती खांद्यावर लोंबकळत होती. भीति कशाचीहि नव्हती, तेव्हां सावध-पणाची तरी गरज काय ?

दगडदेव आला अन् इतक्यांत एका वाघानें मारुतीवर झडप घातली.

नुसत्या वजनाच्या धक्क्यानेंच मारुति कोसळला. पण तेव-ढ्यांत सांवरून तो नीट होतो तोंच वाघानें पाठीकडून धरलेही त्याला. पंजे खांद्यावर रोंवून मान तोंडांत धरायला पहात होता तो.

पण हा कुस्तींतला नेहमीचाच डाव आहे. मारुतीचें डोकें कुस्तीच्याच दिशेनें विचार करीत होते. मारामारीत पैलवान लोक किरकोळ गुंडांपुढे त्यामुळेंच हरतात. मारुतीनें वाघाचा पंजा तसाच दाबला उजव्या खांद्यावर अन् जो डाव केला 'खडी पछाड'चा कीं वाघ खांद्यावरून पुढें जमिनीवर उताणा रप्प्-दिशीं आपटला.

मांजराच्या जातीचा प्राणी पाठीवर आपटणं हें कधीं घडत नाहीं. ती गोष्ट – अन् तीही अगदीं जोरांत घडली – त्या वाघाला विस्मयांत टाकणारी होती. हें 'भक्ष्य' फार 'गरम' पडतं आहे हें पाहून त्यानें तडक बाजूला झाडोऱ्यांत आसरा घेतला.

पण मारुतीची अवस्थाही शोचनीय होती. दहा नखं खोल घुसलेली ओरबाडून निघतांना ७–८ वाघासारखे पट्टे निघाले

होते पाठीचे, अन् रक्ताच्या धारा लागल्या होत्या. थैली-भाला उचलून पोहोंचला विरदेलला तो शुद्धींत. पण तिथें बेशुद्धच झाला.

खेडेगांवच तें. "मारुतिला धनसिंगानें मारले" अशी आवई उठली गांवभर. मारुती शुद्धिवर येतांच 'वाघ आहे' म्हणाला तेव्हां खरी गोष्ट कळली. वाघाचा माग काढायचं ठरलं दुसऱ्या दिवशीं.



पण १०-१५ मैलावर 'वाघ आहे अन् तो रस्ता सोडत नाहीं' अशी बातमी आली. शिकारी गेले तरी वाघ जवळ जवळ स्तब्धच. गोळीनें मारल्यावर फाडून पाहतां पाठीचा कणा जबर दुखावल्यानें त्याचे पाय दुबळे झाले होते असें आढळलें.

कुस्ती निकाली झाली खरी, पण मारुती ऐवजी दुसरा एकादा पोष्टाचा नोकर असता, तर त्याची काय अवस्था झाली असती बरे, कल्पनाच करवत नाहीं.

मूळ कथानायक मामांनंतर ५० वर्षांच्या काळांतील (१९४७) आहे. प्रस्तुत शिकारी अपरिचित राहिले. ज्याना नेहमीं आणिबाणीच्या प्रसंगांना तोंड द्यावें लागते त्यांची वृत्ति अशीच बेडर बनते नाहीकां!

# ९ त्यांत काय मोठेसें

अभोण्याजवळ श्री. विश्वेश्वरअय्या यांच्या कर्तबगारीचें पण आधुनिक युगांत तीर्थक्षेत्र म्हणून पदवीस पोहोंचण्यासारखें स्थान आहे चणकापूर. तें चंडिकापूर आहे कां दुष्काळांत चणक देऊन मजुरी करवली म्हणून चणकापूरच आहे कोण जाणें. पण गिरणेला १०० फूट उंच धरण बांधून १०० चौरस मैल क्षेत्रांतील पाऊस अडवून तलाव केला आहे तेथें. तेव्हां अभोण्यास जाण्याची संधि आल्यावर ही तीर्थयात्रा करून पुण्य साधलें.

धरण पाहून परततों तो डाव्या हाताला कपडे वाळत घातलेले होते त्यांत बिबळ्याचा कपडा दिसला वाळतांना. अगदींच ओला होता तो.

'हें काय ?' तिथें उभे असलेल्या इसमास मी विचारलें. उद्देश 'हें इतकें ताजें कातडें कसें आलें इथें ?' असें विचारण्याचा.

त्या माणसानें हळूच डोक्यांत उजेड पडल्यासारखें करीत म्हटलें, "हें ? हें बिबट्याचं कातडं आहे."

हें सांगायला तूं रे कशाला हवा होतास ? पण लगेच मला ...रबलाची गोष्ट आठवली. आम्ही आपले आंधळेच ठरलों झालं.

“कोणी मारला वाघ ?” प्रश्न.

“मुकादमानं” उत्तर.

धरणाजवळ वस्ती अशी नाहींच. धरणाची देखभाल अन् पाणी कमी-जास्त सोडणें ह्या कामाला जेवढें अवश्य तेवढेच दोन-तीन लोक तिथें राहतात. तेव्हां मुकादम गांठणं कांहीं कठीण नव्हतच. त्याच्या पडवींतच बंदूक लटकावलेली होती.

“इथें अवश्यच आहे ती. पहातांच तुम्हीं, इथें मुद्दाम मोकळी जागा केली आहे. ती वगळली तर दोन हातावरच कांहीं दिसत नाहीं, मग संरक्षणाचा प्रश्न असतोच.” त्यानें सांगितलें.

“वाघ कुठें मारला हा ?” कातड्याकडे बोट दाखवून मी विचारलें.

“तें बिबटं होय. तें मारलं इथेंच त्या भिंतीजवळ.”

‘ती भिंत’ म्हणजे ६ फूट उंचीची. मातीची, दगड कुठें कुठें वापरलेली भिंत होती. शेळ्या बांधायला परडं केलं होतं तिथें.

“इतक्या जवळ कशी आली शिकार ?”

“परवां रात्रीं एक शेळी मारली होती वाघिणीनं तेव्हां ती येणारच पुनः राहिलेली खायला हें ठरलेलेंच.”

“रात्रीं बरं दिसतं ह्या जंगलांत तुम्हांला ?”

“दिसत कांहीं नाहीं रात्रींच. म्हणून तर कंदील ठेवला होता शेळीच्या गाऱ्यावर.”

“अन् मचाण.”

“कसचं मचाण ! मी राहिलों परड्यांत उभा, बाहेरच शेळी होती मारलेली १० फुटांवर. कंदील ठेवला तिथें जळत,

जरा कागद लावला आडोशाला. वाघीण आली ९ वाजतां. ती खायला लागली तशी दिली ठोकून."

"जागच्या जागींच मेली कां ?"

"तेंच जरा वाईट वाटतं. ती जी उसळली ती ह्या झाडोऱ्यांत शिरली. फक्त ६ फूटच आंत गेली होती अन् विवळत होती तासभर चांगली. पण रात्रीं कांहीं पत्ता लागला नाहीं. एक प्रयोग हुकला हो त्यामुळें..."

"कसचा प्रयोग ?"

"वाघीण होती गाभण. इतकी टेकली होती कीं शेळी जरा दूर नेण्याची सुद्धां तिला इच्छा झाली नव्हती. ती कांहीं लागलीच नाहीं मेली. तेव्हांच तपास लागता तर पोट फाडून जिवंत पिलं मिळतात कां पाहिलं असतं ! !"

"पण जखमी जनावरं भयंकर अन् दगेबाज असतात ना ?"

"तें खरंच आहे पण प्राणांतिक जखम झाल्यावर थोड्या वेळानें कसची ताकद राहणार. उसळी मारली तर उसनीच ! होताच भाला बरोबर."

हे गृहस्थ मामांचेच भाऊ दिसले. जणूं काय, सुपारी उचलली, आडकित्यांत कातरली अन् तोंडांत टाकली इतका साधा प्रकार झाला वाघ मारणं म्हणजे.

मग गप्पा मारतां मारतां त्यांनीं माहिती दिली.

"माणसं खाणारे वाघ नाहींतच इथें. जंगलांत कांहीं कमी नाहीं खायला. माझा तर असा अनुभव आहे इथें कीं कांहीं तरी दुबळेपणा अंगीं आल्याविना वाघ पाळीव जनावरांच्या मुक्का-

माच्या जागेकडे येत नाहीं. कधीं पाय दुखावलेला, कधीं दांतच गेलेले नाहींतर दुखरे; पण विशेष आढळणारी गोष्ट म्हणजे दिवस भरायला आल्यामुळें अगोदरच्याच आळसांत भर. मग कुत्रीं, गाढवं, शेळ्या गांवाच्या शिवेजवळ नाहींतर परड्यांतून नेऊन खायला लागतात वाघिणी. लहानच अगदीं असलं बकरूं तर मिळतं. दुसऱ्या दिवशींसुद्धां दुसरं तसंच, पण जरा मोठं गुरू मारलं तर त्याच्या गाऱ्यावर दुसऱ्या दिवशीं शिकारच होते! मग मोठ्ठं होईल जनावर, फार म्हातारं होईल अन् माणसं मारायला लागेल, ही पाळीच कशाला येतें आहे?"

"पण इतक्या जवळून शिकार म्हणजे धोक्याचा कीं!"

"तेंही खरंच आहे म्हणा कांहीं अंशीं, पण आमची बंदूक पाहिली ना तुम्ही? गुळगुळीत नळीची १२ बोअर बंदूक. तिचा माराच मुळी फारतर ५० फूट. त्यापलिकडे म्हणजे वाघासारख्या जनावराला अर्धवट जखमी करून सोडणंच होईल. जितकं जवळ तेवढं बिनचूक अन् जोरांत लागणार. रायफल असती तर दूर-पर्यंत मार लागता पण गोळी सपकन् आरपार गेली असती. मग जखमी जनावर मरायच्या अगोदर शिकाऱ्यापर्यंत पोहोंचण्याचा संभव असतो. १२ बोअरची गोळी भली मोठी अन् धक्काही जबरा बसतो. बरोबर लागली कीं भानगड नाहीं. तेव्हां पत्-करावाच लागतो धोका थोडासा."

"बरं रे बाबा, जिवाशीं गांठ अन् म्हणे थोडा धोका. तो तुझा तुलाच लखलाभ असूं दे. गाडीवान लागलाय जीव पाखडा-यला, सूर्य कलतोय म्हणून. तेव्हां पुरेच.

३२८५०
IRBK-0112957